दैनिक अहमदनगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक
# राष्ट्र सह्याद्री
● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ५ वे ● अंक १७४ वा ● शनिवार, २७ एप्रिल २०२४ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

### आयटी क्षेत्रात नोकरीची संधी

आयटी क्षेत्रात नोकरीची इच्छा असणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. लवकरच आयटी क्षेत्रातील प्रमुख कंपनी टेक महिंद्रामध्ये चालू २०२३-२४ या आर्थिक वर्षात सुमारे सहा हजार फ्रेशर्स कामगारांची मोठी भरती केली जाणार असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मोहित जोशी यांनी दिली. दर तिमाहीत १,५०० पेक्षा जास्त नवीन कामगारांना सामावून घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. तसेच या वर्षभरात आम्ही ५० हजारहून अधिक कर्मचाऱ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे प्रशिक्षण देणार असल्याचे जोशी म्हणाले.

# लोकसभेसाठी दुसऱ्या टप्प्यातील मतदान पूर्ण

**मतदार यादीतील घोळ कायम**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** दुसऱ्या टप्प्याचे मतदान आज काही ठिकाणी सुरळीत तर काही ठिकाणी नाट्यमय पध्दतीने सुरुवात झाली. यावेळी मतदार यादीतील घोळ कायम राहिल्याने केंद्रावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अठराव्या लोकसभा निवडणुकीतील दुसऱ्या टप्प्याच्या मतदानाला सकाळपासून सुरुवात झाली आहे. देशभरातील १३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील एकूण ८८ जागांसाठी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तर महाराष्ट्रातील बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा,यवतमाळ-वाशिम, नांदेड, हिंगोली आणि परभणी या आठ मतदारसंघात आज मतदानाचा रणसंग्राम रंगला. अशातच या निवडणुकांच्या **(पान ४ वर)**




### मतदारसंघनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे

वर्धा - ५६.६६ टक्के
अकोला -५२.४९ टक्के
अमरावती - ५४.५० टक्के
बुलढाणा - ५२.२४ टक्के
हिंगोली - ५२.०३ टक्के
नांदेड - ५२.४७ टक्के
परभणी -५३.७९ टक्के
यवतमाळ - वाशिम -५४.०४ टक्के

### संतप्त मतदाराने कुऱ्हाडीने तोडले ईव्हीएम मशीन

नांदेडमध्ये मतदाराने आपला संताप व्यक्त करताना चक्क ईव्हीएम मशिन फोडले. नांदेड जिल्ह्यातील रामतीर्थ मतदान केंद्रावर हा गंभीर प्रकार घडला आहे. भानुदास एडके या व्यक्तीने मतदान केंद्रात प्रवेश करत चक्क ततझढ मशीन आणि बॅलेट मशीन कुऱ्हाडीने तोडून टाकली.या व्यक्तीने मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यावरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला. संविधान वाचवण्यासाठी आपण हे करत असल्याचे तो ओरडत होता.

### अमरावतीतील सहा गावांचा मतदानावर बहिष्कार

देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७७ वर्षाचा काळ लोटला आहे. मात्र अद्याप कोणत्याही मूलभूत सुविधा मिळाल्या नसल्याचा आरोप करत अमरावती जिल्ह्यातील मेळघाटमधील सहा गावकऱ्यांनी मतदानावर बहिष्कार टाकला आहे. यामध्ये रंगबेली, कुंड, धोकडा, खामदा-किन्हीखेडा, आणि खोपमार या गावांचा समावेश आहे. आजवर निवडून दिलेल्या एकाही लोकप्रतिनिधिने आमच्या गावांना मूलभूत सेवासुविधा पुरवल्या नाहीत. परिणामी आम्ही नाईलाजास्तव हे टोकाचे पाऊल उचलल्याची भावना या गावातील गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# निलेश लंकेंच्या डमी उमेदवारीने नगरला ट्विस्ट!

## नगरी डावपेच : विखे पाटलांच्या संस्थेबाबतही आक्षेप

**अहिल्यानगर :** नगर लोकसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मोठा ट्विस्ट आला. भाजपाने सुजय विखेंना पुन्हा उमेदवारी दिली असून राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून माजी आमदार निलेश लंके यांनी उमेदवारी दाखल केली आहे. अशातच शेवटच्या दिवशी म्हणजे उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या क्षणाला निलेश लंके नावाच्या आणखी एका व्यक्तीने उमेदवारी अर्ज भरला आहे. आता अहमदनगरमध्ये महायुतीचे डॉ. विखे, महाविकास आघाडीचे नीलेश लंके, वंचित बहुजन आघाडीचे दिलीप खेडकर, एम आय एमचे परवेज शेख यांच्यासह निलेश साहेबराव लंके हेदेखील उमेदवारांच्या यादीत सामील झाले.

अहमदनगर लोकसभा निवडणुकीत दोन निलेश लंके उभे राहणार असल्याने एकतर निशाणी नवीन आणि लंकेही दोन दोन अशा संभ्रमात खऱ्या निलेश लंकेंची मते डमी निलेश लंके घेणार असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. दुसरीकडे सुजय विखे यांच्या उमेदवारीवरही प्रतिस्पर्धी उमेदवाराकडून हरकत घेण्यात आली. विखे यांच्या संस्थेने महानगरपालिकेची पाणीपट्टी चूकविल्याचा आरोप त्यात करण्यात आला आहे.

महाविकास आघाडीच्या उमेदवाराचे नाव निलेश ज्ञानदेव लंके असे आहे. यामुळे तुतारी वाजविणारा माणूस मतदारांना शोधावा लागणार आहे. गडबडीत डमी निलेश लंके यांच्या नावासमोरील बटण देखील दाबले जाण्याची शक्यता आहे. **(पान ४ वर)**

### डमी राजकारणाचा आरोप

सुजय विखे यांनीच डमी उमेदवार दिल्याचा आरोप महाविकास आघाडीकडून करण्यात आला आहे. डमी राजकारण करण्याची विखेंची परंपराच आहे. एकाच व्यक्तीने विखे व लंके यांच्यासाठी प्रतिज्ञा पत्राचे स्टॅम्प आणले. शिवाय लंके यांच्या उमेदवारी अर्जासाठी भाजपचेच कार्यकर्ते सूचक अनुमोदक आहेत, निघोज येथील मतदार यादीत पूर्वी नसलेले निलेश लंके यांचे नाव घुसवले गेले, अशी टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी नगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली. आमच्याकडेही सुजय विखे नावाचे दोन डमी उमेदवार आले होते, पण डमी उमेदवार देऊन आम्हाला रडीचा डाव खेळायचा नसल्याचेही फाळके म्हणाले.

# हिवरे बाजार मॉडेल नेपाळमध्ये!




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** आदर्श गाव हिवरे बाजार येथील पाणीपुरवठा व जलसंधारण योजना आता नेपाळमध्येही राबवण्यात येणार आहे. अशी माहिती नेपाळ सरकारचे वरिष्ठ अधिकारी रमेश कुमार यांनी दिली. त्यांनी नुकतीच पारनेर येथील हिवरे बाजार गावाला भेट दिली व येथील जलसंधारण योजनेची माहिती घेतली.

हिवरे बाजार येथे नुकतीच दि. २५ एप्रिल रोजी नेपाळ देशातील मंत्रालयातील पाणीपुरवठा व जलसंधारण विभागाच्या २६ अधिकाऱ्यांनी नेपाळ सरकार व जल शक्ती मंत्रालय ,जल संशाधन ,नदी विकास औगा संरक्षण विभाग केंद्रीय जल आयोग राष्ट्रीय जल अकादमी भारत सरकार यांच्या विद्यमाने आदर्श गाव हिवरे बाजारला प्रत्यक्ष भेट दिली. याप्रसंगी त्यांना पद्मश्री पोपटराव पवार यांनी हिवरे बाजार गावातील संपूर्ण विकास कामांची माहिती दिली.

नेपाळ सरकारचे वरिष्ठ अधिकारी रमेशकुमार यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले, हिवरे बाजारचा अनुभव नक्कीच उपयोगात येईल.नेपाळ व हिवरे बाजारच्या भौगोलीक रचनेत बदल आहे. परंतु हिवरे बाजारने लोकसहभागातून पिक व पाणी व्यवस्थापन केल्यामुळेच हे व्यवस्थित होऊ शकते. हिवरे बाजारमध्ये पाण्याच्या पुनर्भरणापासून ते मातीचे आरोग्य यांची दक्षता घेण्याची गरज आहे. भविष्यकाळात आरोग्यदायी पाणी व अन्नाची गरज आहे ते इथे हिवरे बाजारला पहायला मिळाले.**(पान ४ वर)**

# शरद पवारांच्या आदेशाने भाजपला पाठिंबा!

## धनंजय मुंडे यांचा गौप्यस्फोट; गणेश चतुर्थीला झाली बैठक, व्हिडिओ असल्याचा दावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पुरंदर :** शरद पवार यांनी पुलोदचं सरकार स्थापन केलं. त्याला संस्कार म्हणायचं आणि दादांनी केलं त्याला गद्दारी म्हणायची का? २०१७ ला गणेश चतुर्थीच्या दिवशी कुठे? कशी? बैठक झाली हे व्हिडिओसहीत मी देऊ शकतो. दिल्लीला कुणाच्या घरी शिवसेनेला बाजूला कसं काढायचं, याच्या बैठका शरद पवार यांनी घेतल्या. त्यांनी केलं ते संस्कार आणि दादांनी केलं तर गद्दारी, असा हल्लाच धनंजय मुंडे यांनी चढवला.

पुरंदर येथील जाहीर सभेत धनंजय मुंडे यांनी हा गौप्यस्फोट केला. मुंडे म्हणाले, शरद पवार सांगतायत शिवसेनेला आम्ही भाजपपासून लांब केलं. ती आमची चाल होती आणि उद्धव ठाकरे हसतायत. किती ही हतबलता. त्यावेळी राष्ट्रवादीच्या ५३ पैकी ५३ आमदारांनी भाजपला समर्थन दिलं होतं. त्यांनी कागदावर सह्या केल्या होत्या. दादा हा कागद तुम्हाला दाखवतील की नाही, माहीत नाही. पण कधी तरी मी तो कागद दाखवणार आहे, असं धनंजय मुंडे म्हणाले.

ही निवडणूक भाऊबंदकीची नाही. तर देशाचा पंतप्रधान कोण होणार ही ठरवणारी आहे. ही निवडणूक माझ्या मराठवाड्याच्या मातीसाठी प्रतिष्ठेची आहे. घरी सून आली तरी आपण तिला लेक मानतो. या शिकवणीचा २०२४ च्या निवडणुकीत कुठेतरी विसर पडायला लागलेला आहे. संकुचित मनोवृत्ती या निवडणुकीत व्हायला लागलेली आहे. या निवडणूकीत देशाचं भवितव्य ठरवायचं आहे की एका परिवाराचं भवितव्य ठरवायचयं? हे या निवडणुकीत ठरवायला लागेल, असं मुंडे म्हणाले.

धाराशिव या दुष्काळी जिल्ह्यातून पश्चिम महाराष्ट्राच्या बारामतीमध्ये पवारांच्या घरी जी आमची मराठवाड्याची लेक सून म्हणून दिली गेली, ज्या सुनेला आज बाहेरच म्हटलं जातं. या सुनेवर टीका करताना एक मनात विचार आणा, दादांचा शुभविवाह १९८५ साली झाला. सुनेत्रा वाहिनी सून म्हणून आल्या. हे जवाबदारीने मी बोलतोय. १९८५ ला सुनेत्रा वहिनींचे पाय जेव्हा बारामतीला लागले, त्यानंतरच खऱ्या अर्थाने बारामतीचा विकास चालू झाला, असंही ते म्हणाले.

### ... म्हणून दादा खलनायक!

ज्यांना प्रतिष्ठा द्यायची होती त्यांना प्रतिष्ठा दिली. मी अजितदादांना ओळखतो. अजितदादांनी आजपर्यंत पवार साहेबांच्या थुका ओलांडून कधी राजकारण केलं नाही. जे काय केलं असेल ते त्यांच्या सांगण्यावरूनच केलं, त्यांच्या सांगण्याशिवाय ते करू शकत नाहीत. दादांना सांगायचं एक, करायचं दुसरं आणि झालं तिसरं की दादा खलनायक, असा हल्लाच त्यांनी शरद पवारांवर चढवला.

# ..तर ईव्हीएमच्या मायक्रोकंट्रोलरची पडताळणी होणार: सर्वोच्च न्यायालय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली** - देशात सर्वच ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांद्वारे झालेल्या मतदानाचे व्हीव्हीपॅट द्वारे (व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल) शहानिशा करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. मात्र पराभूत झालेल्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकाच्या उमेदवाराकडून मागणी झाल्यास ईव्हीएमच्या मायक्रोकंट्रोलरची पडताळणी करण्याची सुचना केली आहे. त्यासाठी मतदानानंतर ४५ दिवस ही सगळी मशिन्स सील करून ठेवण्याची सूचनाही कोर्टाने केली आहे.

लोकशाही म्हणजे सर्व संस्थांमध्ये सामंजस्य आणि विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करणे आहे, त्यामुळे सर्वांनीच ही बाब ध्यानात ठेवावी, अंधपणे एखाद्या व्यवस्थेवर सर्रास अविश्वास दाखवणे योग्य नाही असेही न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने म्हटले असून त्यांनी या प्रकरणातील सर्व याचिका फेटाळून लावल्या. या याचिकांपैकी काही याचिकांत देशात पुन्हा मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची मागणी करण्यात आली होती.

आपला निर्णय सुनावताना, न्यायालयाने दोन निर्देश दिले. न्यायमूर्ती खन्ना यांनी निवडणूक आयोगाला चिन्हे लोड करण्यासाठी वापरण्यात येणारी युनिट्स इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनवर लोड केल्यानंतर ४५ दिवसांसाठी सील आणि संग्रहित करण्याचे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम उत्पादकांच्या अभियंत्यांना दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारांच्या विनंतीवरून निकाल जाहीर केल्यानंतर मशीनच्या मायक्रोकंट्रोलरची पडताळणी करण्याची परवानगी दिली.निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांत मायक्रोकंट्रोलरच्या पडताळणीची विनंती केली जाऊ शकते, असे न्यायालयाने सांगितले.मात्र त्यासाठी संबंधीत उमेदवाराला फी भरावी लागेल.

पडताळणीदरम्यान ईव्हीएममध्ये छेडछाड झाल्याचे आढळल्यास, उमेदवारांनी भरलेले शुल्क परत केले जाईल, असे त्यात म्हटले आहे.

कोणत्याही इलेक्ट्रॉनिक मशिन्स मध्ये तीन युनिट्स असतात बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट. तिन्ही मायक्रोकंट्रोलर्ससह जोडण्यात येतात. ज्यात मशिन निर्मात्याकडून बर्न मेमरी बसवली जाते सध्या, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पाच बूथवर व्हीव्हीपॅट चा वापर केला जातो, आणि ईव्हीएमवर नोंदवलेले मतदान आणि प्रत्यक्ष व्हीव्हीपॅटद्वारे **(पान ४ वर)**

### पारदर्शक काचेची मागणी फेटाळली

याचिकांकर्त्यांपैकी एक असलेल्या असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स या स्वयंसेवी संस्थेने व्हीव्हीपॅट मशिनवरील अपारदर्शक काच बदलून तेथे पारदर्शक काच लावण्याची सुचना केली होती. या काचेतून केवळ सात सेकंदांसाठी मतदारांना आपण ज्याला मतदान केले आहे ते मत तेथेच गेले आहे की नाही हे पहाता येते. ती मागणीही फेटाळण्यात आली आहे.

# वाकडीचा तरुण शेअर्स बाजारातील आंतरराष्ट्रीय फसवणुकीचा शिकार!

## पाच लाखाला गंडविले; श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**श्रीरामपूर :** राहाता तालुक्यातील वाकडी येथील एका तरुणाला शेअर्स बाजारात पैसे गुंतवण्याच्या नावाखाली आंतरराष्ट्रीय टोळीकडून गंडविण्यात आले. आमच्याकडे गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल असे आश्वासन देत ४ लाख ९० हजार रूपयांची फसवणूक झाल्या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाकडी येथील निखिल लहारे यांनी याबाबत करण्यात दिली.

राहाता तालुक्यातील वाकडी येथील निखिल लहारे हे मुंबई येथील आयक्युव्हीआ येथे असोसिएट म्हणून काम करतात. त्यांना त्यांच्या मोबाईलवर एक लिंक आली. त्या लिंकवर त्यांनी क्लिक केले असता ब्रड सिक्युरिटी नावाच्या व्हाटस्अप ग्रुपला ते ड झाले. सदर ग्रुप डमिन शरीफसिंग (रा.लंडन) यांची असिस्टंट लीना ग्रिफीत हिने सदर ग्रुपवर शरीफसिंग यांना शेअर मार्केट ट्रेडिंगचा अनुभव असून तुम्ही शेअर मार्केटमध्ये आमच्या मार्फत पैसे गुंतवल्यास तुम्हाला त्याचा चांगला परतावा मिळेल, असे सांगितल्याने लीना ग्रिफीत हिने टेलिग्राम पवरून वेगवेगळया बँक अकौंटचे डिटेल्स दिले व तुम्ही यामध्ये पैसे गुंतवा असे सांगितले. त्यामुळे श्री. लहारे यांनी सुरूवातील इंडस बँक, वर्सोवा, अंधेरी यामध्ये १५ हजारांची ११ मार्च २०२४ ला गुंतवणूक केली. त्या गुंतवणुकीत त्यांना १० टक्के परतावा मिळाला. त्यामुळे त्यांनी पुन्हा १२ मार्चला त्याच बँकेत २० हजार नंतर १४ मार्चला ३० हजार नंतर **(पान ४ वर)**

# कांदा निर्यात बंदीचा फटका महाराष्ट्राला

## अन् गुजरातच्या २००० मेट्रिक टन कांदा निर्यातीला मंजुरी

केंद्राचा हा निर्णय महाराष्ट्रावर अन्याय करणारा आहे. गुजरातमध्ये महाराष्ट्राच्या २५ टक्केही कांदा पिकत नाही. असे असताना तेथील निर्यातीस परवानगी अन् महाराष्ट्रात बंदी हे चुकीचे आहे. राज्यातही ५० टक्के कांदा निर्यातीस परवानगी द्यायला हवी.

**- महादेव राऊत, कांदा व्यापारी**

गुजरातच्या पांढऱ्या कांद्याची निर्यात हा निर्णय गुजरात आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये संघर्ष निर्माण करण्याचा डाव असू शकतो. फक्त गुजरातच्याच पांढऱ्या कांद्याला परवानगी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर हा अन्याय आहे.

**- निवृत्ती न्याहारकर, अध्यक्ष बळीराजा शेतकरी गट, नाशिक**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नाशिक :** देशभरात विशेषत: महाराष्ट्रात कांदा निर्यातबंदी असताना केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने ऐन लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत गुजरातमधून २००० मेट्रिक टन पांढरा कांदा निर्यातीस मंजुरी दिल्याने राज्यातील व्यापारी आणि शेतकऱ्यांत संताप व्यक्त होत आहे. गुजरातमधील मुंद्रा पोर्ट, पिपापाव पोर्ट आणि महाराष्ट्रातील नवी मुंबईच्या न्हावा-शेवा अर्थात जेएनपीए बंदरातून गुजरातच्या कांद्याच्या निर्यातीस परवानगी देण्यात आली आहे.

केंद्राने ८ डिसेंबर २०२३ पासून राज्यात कांद्याच्या निर्यातीस बंदी घातल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. यावरून नाशिक, पुणे, जळगाव, अहमदनगर परिसरातील शेतकऱ्यांत तीव्र



संताप व्यक्त होत आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी यावरून अनेकदा आंदोलनेही केली आहेत. अनेक ठिकाणी बाजार समित्याही बंद ठेवल्या होत्या. मात्र, या आंदोलनानंतरही केंद्र सरकारने भाव नियंत्रित ठेवण्यासाठी कांदा निर्यातीस परवानगी दिलेली नाही.

उन्हाळी कांदा देशभरातील बाजार समित्यांत कवडीमोल भावाने विकला जात आहे. असे असताना फक्त गुजरातमध्ये पिकणाऱ्या पांढऱ्या कांद्याच्या निर्यातीस केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने २५ एप्रिलला परवानगी दिली. यानुसार गुजरातचा २००० मेट्रिक टन कांदा एनसीईएलच्या ऐवजी थेट निर्यातदारांच्या माध्यमातून निर्यातीस परवानगी दिली आहे.

# संपादकीय

## वारसा कराचा आरसा

घुसपैठिये, मंगळसूत्र, अपत्यसंख्या अशा जाज्वल्य विषयांनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर आकारणीसारख्या अभ्यासपूर्ण विषयास हात घातला हे उत्तम झाले. वास्तविक निवडणुकांचा हंगाम हा काही कर आकारणी, करांचे दर इत्यादी गहन मुद्द्यांवर मौलिक मार्गदर्शनास योग्य नाही. पण काँग्रेसचे सॅम पित्रोदा यांच्या वक्तव्याचे निमित्त झाले आणि पंतप्रधानांनी एकदम आर्थिक धोरण या मुद्द्यालाच तोंड फोडले. अमेरिकेत आहे त्याप्रमाणे भारतातही वारसा कर (इनहेरिटन्स टॅक्स) वा तत्सम काही व्यवस्था असायला हवी, असे या पित्रोदा यांचे मत. ते त्यांनी अमेरिकेत व्यक्त केले. त्यावर येथे काँग्रेस तुम्हास मरणानंतरही लुटत राहील, असा हल्ला पंतप्रधानांनी चढवला. त्यांच्या मते हा वारसा कर हा श्रीमंतांना लुटण्याचाच एक प्रकार. पंतप्रधानांच्या या टीकेवर आणि या कररचनेवर भाष्य करण्याआधी त्यांच्या टीकेचे स्वागत का, ते सांगायला हवे. पंतप्रधानांनी पित्रोदा यांच्या विधानावर सडकून टीका केली नसती तर ज्यासाठी ही टीका झाली तो कर भारतात आकारला जायला हवा, असे पंतप्रधानांचे पहिले अर्थमंत्री अरुण जेटली यांचे मत होते, याचे स्मरण करून देता आले नसते. तसेच हेही सांगता आले नसते की २०१७ साली जेटली यांनी केलेली 'भेट कर' सुधारणा ही प्रत्यक्षात वारसा कराचेच एक रूप होते. त्यावर टीका झाल्यावर या सुधारणेत सुधारणा केली गेली, हे सांगण्यास एरवी कारण मिळाले नसते. इतकेच काय २०१८ साली असा कर पुन्हा एकदा आणला जावा अशीही त्यांची इच्छा होती, हे पंतप्रधानांनी टीका केली नसती तर आता कसे सांगता आले असते? तसेच सध्या विस्मृतीत गेलेले बुद्धिमान, माजी अर्थराज्यमंत्री जयंत सिन्हा यांनी तर या वारसा कराचे जाहीर समर्थन केले होते, याची आठवण करून देण्याची संधी यामुळे मिळाली नसती. पंतप्रधानांनी पित्रोदा यांच्यावर टीका केल्यामुळेच 'उजव्या' गटातल्या 'स्वराज' नावाच्या 'पारिवारिक' नियतकालिकात या कराच्या समर्थनार्थ कसे लेख छापले गेले होते, हे आठवता आले. हे सर्व शक्य झाले पंतप्रधानांनी पित्रोदा यांच्या निमित्ताने या कराविरोधात सडकून टीका केल्यामुळे. या स्मरणरंजनाची संधी त्यांनी दिली याचे समाधान. आता या कररचनेचा पूर्व आणि उत्तरपक्ष.

पहिला मुद्दा म्हणजे ही कल्पना अर्थविचाराच्या जन्माइतकी जुनी आहे. आर्थिक समानता कशी आणावी यावर तज्ज्ञांचे एकमत नाही. एका वर्गास संपत्ती निर्मितीची प्रक्रिया ही पायापासून शिखरापर्यंत असायला हवी असे वाटते तर दुसऱ्याच्या मते संपत्तीचा प्रवाह वरून खाली जायला हवा. श्रीमंत जसे अधिकाधिक श्रीमंत होत जातील तसतशी त्यांची श्रीमंती खाली झिरपत जाईल, असा त्याचा अर्थ. श्रीमंतांना 'लुटून' संपत्ती गरिबांत वाटायची रॉबिनहुडी कल्पना याच विचारातून जन्मली. एका अर्थी नक्षलवादाचाही उगम याच विचारधारेत आढळेल. यास अनेक देशांनी मूर्त रूप दिले आणि काही देशांत ते अजूनही तसे अमलात आहे. उदाहरणार्थ अमेरिका. त्या देशात एखादा अब्जाधीश निवर्तला की त्याच्या संपत्तीच्या मूल्याचा ४५ टक्के इतकाच वाटा त्याच्या वारसांना मिळतो. उर्वरित ५५ टक्के संपत्ती सरकारदरबारी जमा होते. हा वारसा कर. ''तुम्ही कमावलेत आणि तुमच्या आयुष्यात त्याचा उपभोगही घेतलात. तथापि तुमच्या पुढच्या पिढीस हे सारे आयते मिळता नये. या संपत्तीवर समाजाचाही हक्क आहे'' असा या कर आकारणीमागील विचार. विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांस तर हा कर ६० टक्के वा अधिक असावा असे वाटते. याचप्रमाणे इंग्लंड, स्वित्झर्लंड, जपान अशा अनेक देशांत आजही हा वा असा संपत्ती कर आकारला जातो आणि त्या देशांतील धनवान तो आनंदाने भरतात. तेव्हा श्रीमंतांकडून जमेल तितके अधिक काढून घ्यावे आणि जमेल तितके ते गरिबांस वाटावे असा हा विचार. तो नवा नाही आणि मोदी यांचा पक्ष, त्यांचे अर्थमंत्री, 'त्या' बाजूचे अर्थतज्ज्ञ हे सर्व त्यास अनभिज्ञ नाहीत.

वास्तविक आपल्याकडे स्वातंत्र्यानंतर पहिल्या निवडणुकात सत्तेवर आलेल्या सरकारातही हा कर होता. 'इस्टेट ड्युटी' नावाने ओळखला जाणारा हा कर पं. नेहरू यांच्या कार्यकालात १९५३ साली पहिल्यांदा लावला गेला आणि १९८५ साली त्यांचे नातू राजीव गांधी यांनी त्यास मूठमाती दिली. त्या वेळी राजीव यांचे अर्थमंत्री होते विश्वनाथ प्रताप सिंग. या कराचा अंत झाला तो काही त्याचे गुणावगुण, उपयुक्तता इत्यादीमुळे नाही. तर या कराच्या वसुलीसाठी करावा लागणारा खर्च हा या करातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिक होऊ लागला म्हणून. या करास इतके निष्प्रभ करण्याचे श्रेय निर्विवाद भारतीय धनाढ्यांचे. आपल्या देशातील लोकशाहीत सर्व नागरिकांस समान दर्जा असला तरी काही अधिक समान असतात हे आपण सर्व जाणतोच. या वास्तवात अद्यापही फरक पडलेला नाही, हेही आपण अनुभवत आहोत. तेव्हा 'आहे रे' वर्गाकडे जे अधिक आहे ते काढून घेण्याचा सरकारचा समाजवादी प्रयत्न सपशेल फसला. त्यामुळे 'नाही रे' वर्गांत ते वाटण्याचा प्रश्नच नाही. या 'आहे रे' वर्गास करबचतीचे अनेक मार्ग असतात आणि पगारदार वर्गास मात्र 'टीडीएस' (टॅक्स डिडक्टेड ॲट सोर्स) मुळे प्रामाणिक करदाते बनण्याखेरीज पर्याय नसतो. तेव्हा धनाढ्यांवरील हा कर रद्द झाला हे आश्चर्य नाही.

आश्चर्य हे की आपण भांडवलदारवादी, उद्योगस्नेही इत्यादी इत्यादी असल्याचा दावा करणारे, त्या दाव्याच्या आधारे निवडून आलेलेही सत्तेवर आले की समाजवादी विचारांचाच आसरा घेतात! उदाहरणार्थ विद्यमान उद्योगस्नेही सरकारच्या काळात राबवल्या जात असलेल्या विविध समाजोपयोगी योजना. याचे अगदी साधे उदाहरण म्हणजे ८० कोटी 'गरीब' (?) नागरिकांसाठी अखंड राबवली जाणारी मोफत धान्य योजना. श्रीमंतांकडील जास्तीचे काढून ते गरिबांस वाटणे हा विचार जर इतका नामंजूर असेल तर या ८० कोटी नागरिकांस दिल्या जाणाऱ्या मोफत धान्याचे काय? त्याचा खर्च सरकार कोणाकडून वसूल करते? जनधन ते पंतप्रधानपदाच्या नावे राबवल्या जाणाऱ्या अनेक योजनांच्या खर्चाचे काय? जे मूठभर करदाते आहेत त्यांच्याकडून अधिकाधिक कर रक्कम घेऊन कथित गरीबकल्याण योजना राबवणे आणि त्या आधारे निवडणुकांत मते मागणे हेच तर विद्यमान जनकल्याण योजनांचे सूत्र. ते आधीही होते आणि आताही तेच आहे. कराची रचना व्यापक करणे, अधिकाधिकांस करजाळ्यात आणणे वगैरे नुस्त्या शिळोप्याच्या गप्पा. त्या आधीही होत्या आणि आताही अधिक जोमात सुरू आहेत. श्रीमंत शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर कर आकारण्याची हिंमत आधीच्या सरकारांनाही नव्हती आणि आताच्या सरकारकडेही नाही. शेतीउत्पन्नावर कर आकारणी हा मुद्दा दूरच, साधे खतांवरील अनुदानात कपात करण्याचे धाडस आपल्या कोणत्याही सरकारांमधे नाही. तेव्हा सध्याचे उजवे सत्ताधारी असोत की विचारधारेच्या डावीकडचे वा डाव्याउजव्यांमधले काँग्रेससारखे अन्य कोणी असोत. श्रीमंतांकडून घ्यावे आणि गरिबांत वाटावे या समाजवादी मोहावर मात करणे कोणालाही जमलेले नाही. इतकेच काय आताही 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी'सारख्या संस्था, थॉमस पिकेटींसारखे अर्थविचारवंत अशा अनेकांकडून असे काही करता येईल का याबाबत चाचपणी सुरू आहे. तेव्हा सॅम पित्रोदांच्या विधानावर पंतप्रधानांनी काँग्रेसला झोडपले ते बरे झाले. यानिमित्ताने हा वारसा कराचा आरसा समोर धरता आला.

# बहिणीचं प्रेम कुठेतरी कमी पडलं

## सुप्रिया सुळे यांचा अजित पवारांना टोला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**बारामती :** संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागून असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात नणंद-भावजय यांच्या लढत होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची कन्या आणि नेत्या सुप्रिया सुळे या महाविकास आघाडीकडून लढत आहेत. नतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार महायुतीकडून निवडणुकीचा रिंगणात आहेत. यामुळे बारामतीमधील राजकीय वातावरण तापलं आहे. अशातच अजित पवार यांनी केलेल्या वक्तव्यावरून आता सुप्रिया सुळे यांनी त्यांच्यावर निशाणा साधला आहे. ङ्गबहिणीचं प्रेम कुठेतरी कमी पडलंफ, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे यांचा जोरदार प्रचार सुरू आहे. या दरम्यान सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ङ्गबायको म्हणाली, अहो हे काम करुन द्या, तर करावेच लागणार. नाहीतर माझं काही खरं नाही. त्यामुळे माझ्या पत्नीला निवडून द्याफ, असे आवाहन अजित पवार यांनी केले होते. त्यावर सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली. कदाचित बहिणीचं प्रेम कमी पडलं असेल. दुर्दैवाने सगळेच नात्यांमध्ये अडकले आहेत. मी पहिला देश, मग राज्य, मग पक्ष आणि मग नाती पाहते. मी नात्यांसाठी राजकारणात आले नाही. तर मायबाप जनतेची सेवा करण्यासाठी आली आहे. दादा असं बोलतात याचा मला आश्चर्य वाटतंफ, असा टोला सुप्रिया सुळे यांनी लगावला.

आम्ही १८ वर्षे एका संघटनेत काम केलं. दादा पालकमंत्री होते. मी या भागाची लोकप्रतिनिधी म्हणून काम करत होते. तरीही दादा माझ्या कामाबाबत बोलतात याचं आश्चर्य आहे. दादांची एक खासियत होती. ती म्हणजे विरोधी पक्षाचे काम करणारा एक कणखर नेता. पण आता त्यांची भाषणं कानावर येतात तेव्हा खूप आश्चर्य वाटतं. मला माहितीये हे अजितदादा नाहीत, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

# ६० मुलांच्या बापाने केले मतदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अमरावती :** रस्त्याच्या कडेला सोडून दिलेल्या बेवारस, दिव्यांग मुलांना पितृछत्र देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्यभर धडपड करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर यांच्या अचलपूर तालुक्यातील वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य दिव्यांग, बेवारस बालगृहाच्या इतिहासात मतदानाची महत्वपूर्ण नोंद झाली आहे. बेवारस मुलांना वडिलांचे नाव देणारे शंकरबाबा पापळकर आपल्या ६० मुलांसह वझ्झर येथील प्राथमिक शाळेच्या २१५ क्रमांकाच्या मतदान केंद्रावर पोहचले. या सर्वांनी मतदानाचा हक्क बजावला.

दृष्टिहीन, मूकबधीर व पोलिओग्रस्त मुलांचासुद्धा त्यात समावेश आहे. गेल्या १५ ते२० वर्षांपासून ही मुले या बालगृहात राहत आहेत. सर्वांच्या नावापुढे शंकरबाबा पापळकर हेच नाव असल्याने तेच त्यांचे पिता आहेत. रस्त्यावर, कचराकुंडीत, रेल्वेस्टेशन, बसस्थानकावर तसेच अन्य ठिकाणी टाकून दिलेल्या मुलांचा सांभाळ शंकरबाबा पापळकर पित्याप्रमाणे करतात. या मुलांना रोजगार मिळवून देण्यासोबतच त्यांचे लग्न लावून देण्याचे अतिशय आव्हानात्मक कार्य शंकरबाबांनी गेल्या अनेक वर्षांपासून हाती घेतले आहे. आपल्या मुलांना मतदानाचा हक्क मिळावा, यासाठीसुद्धा त्यांनी लढा दिला.गेल्या लोकसभा निवडणुकीत येथील ४८ मुलांनी मतदानाचा हक्क बजावला होता. यावेळी त्यांनी मतदान जनजागृतीसाठीही प्रयत्न केले. प्रत्येकाने लोकशाही समृद्ध करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, असे आवाहन शंकरबाबा पापळकर यांनी केले.

# उसने पैसे परत मागितल्याने मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** ऊसने दिलेले ५० हजार रुपये परत मागीतले म्हणून आरोपींनी रविंद्र माळी यांना शिवीगाळ करुन मारहाण केल्याची घटना राहुरी तालूक्यातील मानोरी येथे दि. २२ एप्रिल २०२४ रोजी घडली आहे. रविंद्र कारभारी माळी, वय ४० वर्षे, रा. मानोरी ता. राहुरी. यांनी राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, रवींद्र माळी यांनी चंदु गायकवाड यांना चार महिन्या पुर्वी ५० हजार रुपये उसने दिले होते. दि. २२ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९.३० वा. चे सुमाराम रवींद्र माळी यांनी चंदु गायकवाड यास उसने दिलेले ५० हजार रुपये मागीतले. तेव्हा चंदु गायकवाड हा म्हणाला की, मी तुझे उसने घेतलेले पैसे देणार नाही, तुला काय करायचे ते करुन घे. असे म्हणुन शिवीगाळ करू लागला. त्याचवेळी इतर आरोपी आले व म्हणाले कि, तु चंदुला एकटे गाठुन दम देतो काय? असे म्हणून आरोपींनी रवींद्र माळी यांना शिवीगाळ करुन लाकडी दांडा व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. तसेच तु जर परत उसने दिलेले पैसे मागीतले तर आम्ही तुझा बेतच पाहु, अशी धमकी दिली.

रविंद्र कारभारी माळी यांच्या फिर्यादीवरून आरोपी चंदु रावसाहेब गायकवाड, रावसाहेब गायकवाड, भाउराव रंगनाथ ठाकर, दादासाहेब रावसाहेब गायकवाड, सर्व रा. मानोरी, ता. राहुरी. यांच्यावर गून्हा रजि. नं. ५००/२०२४ भादंवि कलम ३२३, ३२४, ३३६, ३४, ५०४, ५०६ प्रमाणे मारहाण व धमकी दिल्याचा गून्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

# अहमदनगर लोकसभा मतदार संघात छाननीत ३६ अर्ज वैध तर ६ अवैध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर :** अहमदनगर लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी आज २६ एप्रिल रोजी पार पडलेल्या छाननी प्रक्रियेत ३६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असुन ६ उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज अवैध ठरले असल्याची माहिती अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या उपस्थितीत सर्व उमेदवारांच्या अर्जाची छाननी प्रक्रिया पार पडली. त्यात हनुमंत देविदास पावणे (अपक्ष), शरद बाबुराव माघाडे (अपक्ष), ज्ञानदेव कारभारी पाडळे (अपक्ष), शेळके विश्वनाथ श्रीरंग (अपक्ष), पानसरे छगन भिकाजी (अपक्ष) व प्राजक्त प्रसादराव तनपुरे (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार) यांचे नामनिर्देशन अर्ज अवैध ठरले आहेत. उमेदवारांना सोमवार, दि. २९ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी ३-०० वाजेपर्यंत आपले अर्ज मागे घेता येणार आहेत. दि. १३ मे रोजी ३७-अहमदनगर लोकसभा मतदार संघासाठी मतदान होणार आहे. या लोकसभा निवडणूकीचा निकाल मंगळवार दि. ४ जून रोजी जाहिर करण्यात येणार असल्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांनी कळविले आहे.


# जीवनात अध्यात्मिक गुरुशिवाय प्रगती अशक्य : शर्मा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** जीवनात अनेक ग्रंथ आहेत, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी आहे तुकोबांची गाथा आहे नाथांचं भागवत आहे. रामायण आहे वाल्मीकीचं रामायण आहे. नाथांचे भागवत आहे. तुलसीदासजींचे रामायण आहे. सगळे ग्रंथ घरात आहेत सगळं आहे. सगळं आहे पण तुमच्या जीवनात अध्यात्मिक गुरुशिवाय तुमची प्रगती होत नाही असं प्रतिपादन हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांनी केले. नगर तालुक्यातील आदर्श गाव हिवरे बाजार येथे अयोध्येतील रामलला शीलांश स्थापनेनिमित्त श्रीराम नवमीच्या आदल्या दिवशी अष्टमी ते चैत्र शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी येणाऱ्या हनुमान जयंती पर्यंत श्री राम कथा उत्सवाचे आयोजन करण्यात आलं होतं. या कथेचा समारोप सोमवारी झाला आणि मंगळवारी सकाळी सभा मंडपात हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांचे काल्याचे किर्तन झालं त्यावेळी ते बोलत होते. काल्याच्या कीर्तनात श्रीकृष्णाचं चरित्र मांडत असताना ते म्हणाले की माणसाला आयुष्यात प्रभू श्रीरामाप्रमाणे आचरण करण्याचे गुरु सांगतात पण श्रीकृष्णासारखं वागू नये असा दंडक आहे. कारण श्रीकृष्णाने आयुष्यात जे भोगलं ते दुःख इतर कुणीच भोगले नाही असं मला वाटतं नव्हे ते खरंच आहे. जीवनात अध्यात्मिक प्रगतीसाठी गुरु हा आवश्यकच आहे. हे विशद करताना त्यांनी घरात पाण्याने भरून ठेवलेली घागर आणि त्यावर असलेली झाकण म्हणून ठेवलेली वाटी याचं उदाहरण त्यांनी दिल. घागर भरलेली असते. वाटी रिकामी असते. एकदा वाटीने घागरीकडे खंत व्यक्त केली की इतकी वर्ष मी तुझ्यासोबत आहे पण तू मला एक थेंब पण पाण्याचा टिपूस दिला नाही हे वाईट आहे. त्यावर घागर वाटेला म्हणाले की ज्याच्याकडून तुला काही हवं असेल त्याच्या डोक्यावर नाही तर त्याच्या पायापाशी बसले पाहिजे हे जीवनाचे सूत्र आहे. तुमच्या घराचा जेवढा प्लॉट आहे. तेवढं बांधकाम नाही. जेवढं बांधकाम आहे तेवढा दरवाजा नाही. जेवढा दरवाजा आहे तेवढी कडी नाही. जेवढी कडी आहे तेवढे कुलूप नाही. जेवढं मोठं कुलूप आहे तेवढी किल्ली नाही. आणि घर उघडण्यासाठी चावी ही लागतेच मग महत्त्व कोणाला आहे हे ओळखा.

# एसटी स्टँड परिसरात आढलला बेवारस मृतदेह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** आज दि. २६/४/२०२४ रोजी रात्री तीन वाजेच्या सुमारास श्रीरामपूर एसटी स्टँड परिसरात एक अनोळखी बेवारस पुरुष जातीचा मृतदेह आढळून आला आहे.

वय अंदाजे ७० वर्ष अंगात राखाडी रंगाचा फुल बायाचा शर्ट सदर बाबत श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यू नोंद झाली असून पुढील तपास पोलीस नाईक बारसे करीत आहे.

# भर दिवसा महिलेच्या गळ्यातील दागिने हिसकावले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**वैजापूर :** भरदिवसा चोरट्यांनी ५८ वर्षीय महिलेच्या गळ्यातील तीन लाख वीस हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हिसकावून पसार झाल्याची घटना शुक्रवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास गंगापूर चौफुली परिसरात घडली. या घटनेबाबत पोलिसांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार जालना येथील रहिवासी सुवर्णमाला एकनाथ गायकवाड वय ५८ वर्षे या वैजापूर शहरात त्यांच्या नातलगाच्या विवाह समारंभासाठी कुटुंबीयांसह आलेल्या होत्या.विवाह समारंभ कार्यक्रम झाल्यानंतर त्या गंगापूर चौफुली येथे रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कार मध्ये बसताना दुचाकीवरून आलेल्या दोघा चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ३ लाख २० हजारांचे दागिने हिसकावून पसार झाले. चोरट्यांचा पाठलाग करण्याचा त्यांच्या मुलांनी प्रयत्न केला. मात्र चोरटे त्यांना मिळून आले नाही,या प्रकरणात गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार वैजापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा अधिक तपास वैजापूर पोलीस करीत आहे. मात्र भरदिवसा घडलेल्या या चोरीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# खा. सुजय विखेंना निवडून आणण्यासाठी नारायण धोंगडेंनी उचलला वसा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राज्याचे महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील मा. मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या आदेशानुसार भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार खा. सुजय विखे पाटील यांना प्रचंड मताने विजयी करण्यासाठी नगर दक्षिण मतदार संघातील राहुरी नगर शहर नगर तालुका श्रीगोंदा पारनेर कर्जत शेवगाव पाथर्डी जामखेड या या तालुक्यातील सर्व संत नामदेव शिंपी समाज व सर्व ओबीसी समाज सर्व नागरिकांशी घरोघरी संपर्क करून चर्चा करून सुजय दादाच का खासदार म्हणून पाहिजे याचे विश्लेषण करून मतदारांना खा. विखे यांच्या कामाचे महत्त्व पटवून देत त्यांना प्रचंड बहुमताने विजयी करा अशी आवाहन करीत असून त्यांच्या या आवाहनाला मतदारांकडून



**भाजपाचे ओबीसी मोर्चा चे जिल्हा सरचिटणीस नारायण धोंगडे यांनी नामदेव शिंपी समाजातील घरोघरी जाऊन खा. सुजय विखे यांना मतदान करून विजयी करण्याचे आवाहन करीत आहेत. छाया : राजेंद्र परदेशी**

उदंड असा प्रतिसाद लाभत असून समाजाने केलेल्या या कार्याचे संपूर्ण जिल्ह्यातील नामदेव शिंपी समाज कौतुक करीत आहेत व त्यांच्या आवाहनाला दाद देत आहेत. दरम्यान नारायण धोंगडे व सर्व तरुण वर्ग हा नामदेव शिंपी समाजाच्या संपूर्ण जिल्ह्यात घरोघरी जाऊन त्यांना सुजय विखे पाटील यांना मतदान करण्याचे आवाहन करीत असून व मतदार सुद्धा त्यांच्या आवाहनाला दुसरा देत असल्यामुळे खासदार सुजय विखे यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

# विद्याधाम प्राथ. शाळेचे १८६ विद्यार्थी मंथन परीक्षेत झळकले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिरूर :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील विद्याधाम प्रशाला प्राथमिक शाळेत शिरूर प्रज्ञाशोध राज्यस्तरीय परीक्षेत इयत्ता पहिलीचे १०३ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते .त्यात बोऱ्हाडे शरण्या हिने १५०पैकी १५० गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला तर जिल्ह्यात ९ व केंद्रात ३६ विद्यार्थी असे एकूण ४६ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

इयत्ता दुसरीचे १४१ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यातील स्वास्तिक बेलोटे हा राज्यात दुसरा आला. वेदांत सोनवणे राज्यात तिसरा, अभिज्ञा अडसूळ, श्रीयांश पडवळ, वेदांत निंबाळकर यांचा राज्यात चौथा क्रमांक आला , गौरी बांदल , राजलक्ष्मी बोरकर, दिया मोरबाळे यांचा ५ वा क्रमांक आला . या ८ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत , तसेच जिल्ह्यात २३ व केंद्रात ५६ विद्यार्थी असे एकूण ८७ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

इयत्ता तिसरीचे एकूण १४० विद्यार्थी परीक्षेत बसले होते .त्यातील जिल्ह्यात १ व केंद्रात २५ असे एकूण २६ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

इयत्ता चौथीतील एकूण १२० विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यातील दांडेकर गौरेश या विद्यार्थ्यांनी ३००पैकी २९६ गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला तसेच जिल्ह्यात एक व केंद्रात २५ असे एकूण २७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

विद्याधाम प्रशालेचे राज्यात १० विद्यार्थी, जिल्ह्यात ३४ ,केंद्रात १४२ असे एकूण १८६ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्पना कोकाटे , संगीता बांडे , लता निमसे, जयश्री पाचारणे, अर्चना वाटेकर , निलिमा पाठक , अर्चना भालेराव ,

नंदिनी गायकवाड , रुपाली गायकवाड रूपाली, अनिता पडवळ , अर्चना पिंपरकर , चैताली घोलप , दिपाली मांडगे , भाग्यश्री आसवले ,रोहिणी औटी ,कांचन शिंदे ,सोनाली गोरे, सौ. कविता मगर, विरक्ती गोऱ्हे, नीलम नऱ्हे , साधना खेडकर ,छाया दिवटे , भारती दाभाडे ,अर्चना घोगरे ,सोनाली घेगडे ,रुपाली करंजकर ,ज्योती अडसूळ साधना कोतकर या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

या यशाबद्दल शिरुर शिक्षण प्रसारक संस्थेच्या पदाधिका-यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

# ‘अशोक’ने ३० एप्रिलच्या आत उसाचे पेमेंट करावे

## शेतकरी संघटनेचा आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : अशोक कारखाना व्यवस्थापनाने ३० एप्रिलच्या आत गाळप झालेल्या संपूर्ण उसाचे एफआरपी पेमेंट अदा करावे, अन्यथा शेतकरी संघटना तीव्र स्वरूपाचे आंदोलन करील, असा इशारा शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे दिला आहे.

पत्रकात औताडे यांनी म्हटले आहे की, अशोक सहकारी साखर कारखान्यावर गेल्या ४० वर्षापासून भानुदास मुरकुटे यांची सत्ता आहे. मुरकुटे यांनी सातत्याने अशोक शेजारील गणेश व डॉक्टर तनपुरे कारखान्याची उदाहरणे देऊन सभासदांना खोटी भीती दाखवली. परंतु अशोक कारखान्याची वस्तुस्थिती समोर येऊ दिली नाही. याबाबत शेतकरी संघटनेने गेल्या १२-१३ वर्षापासून स्वर्गीय बबनराव काळे व आता राज्य उपाध्यक्ष अ‍ॅड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने कारखान्याच्या आर्थिक व्यवहाराची पोलखोल केली. २००९-१० मध्ये साखरेचे दर २२०० रुपये क्विंटल असताना अशोक कारखान्याने दोन हजार रुपये प्रतिक्विंटल दर दिला. त्यावेळी कारखान्याकडे कुठलेही उपपदार्थ निर्मितीचे प्रकल्प अस्तित्वात नव्हते. उपपदार्थ निर्मितीचे प्रकल्प अस्तित्वात नसतानाही साखरेचे दर व उसाच्या दरामध्ये फक्त दोनशे रुपयांचा प्रतिटन फरक होता. आज साखर ३५ रुपये प्रतिक्विंटल असून उसाचा दर २७०० प्रतिटन आहे. तसेच कारखान्याकडे उपपदार्थ निर्मितीचे प्रकल्प आहेत तरीही अशोक कारखाना १५ जानेवारी ते १५ एप्रिलपर्यंतचे पेमेंट करण्यास असमर्थ ठरत आहे.

कारखाना व्यवस्थापनाच्या भ्रष्ट व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांचे ऊस पेमेंट होते की नाही, अशी परिस्थिती आहे. कारखान्यावर पाचशे पस्तीस कोटी रुपये एकूण कर्ज आहे. या कर्जाबादत वस्तुस्थिती न मांडता केंद्राच्या धोरणावर व साखरेच्या दरावर बोट दाखवून ऊस उत्पादकांची दिशाभूल करण्याचे काम चालू आहे. परंतु भानुदास मुरकुटे यांनी अद्यापपर्यंत केंद्राच्या व राज्य सरकारच्या धोरणाबाबत कधीही संघर्ष केलेला दिसून येत नाही. यावरून ही फक्त नौटंकी असल्याचेच दिसून येत आहे. हा फॉर्म्युला भानुदास मुरकुटे यांचा गेल्या पंचवीस वर्षापासून सुरू आहे. त्यामुळे अशा चुकीच्या पद्धतीने शेतकऱ्यांची दिशाभूल करून घेतली जाणार नाही, असा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे.

अशोक कारखाना व्यवस्थापनाने नाबार्डचे निकष डावलून मनमानी पद्धतीने जिल्हा बँकेकडून गरज नसताना वित्त पुरवठा घेतल्यामुळे शेतकऱ्यांचे एफआरपी पेमेंट रखडले आहे. शेतकऱ्यांचे एफआरपी पेमेंटची तरतूद करण्यासाठी शासनाची आरआरआर सी कारवाई असून साखर आयुक्तांनी आरआरसी दाखल केल्यास अशोक कारखान्याची मालमत्ता साखर आयुक्तांना जप्त करण्यासाठी शिल्लक राहिलेली नाही. अशोक कारखान्याने गाळप केलेली संपूर्ण साखर जिल्हा बँकेने जप्त केली असून संपूर्ण मालमत्ता जिल्हा बँकेला तारण असल्यामुळे साखर आयुक्तांपुढे आरआरसी कारवाई करण्याचाही प्रश्न निर्माण होणार आहे. कारखाना व्यवस्थापनाने १३५ कोट पूर्व हंगामी कर्ज संचालकांच्या मालमत्तेवर प्रतिज्ञापत्र देऊन राज्य सरकारच्या थकहमी योजनेचा ही वापर केला आहे. वास्तविक राज्य सरकारची थकहमी योजना ही अडचणीच्या काळात वापरण्याची योजना असून अशोक कारखान्याने गरज नसताना यापूर्वीच सदर योजनेचा उपयोग करून तीही पत संपविली आहे. त्याचप्रमाणे कायमस्वरूपी कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांवर व अधिकाऱ्यांवर प्रतिकर्मचारी बारा लाख रुपये अशा स्वरूपाचे व्यक्तिगत कर्जही राष्ट्रीयीकृत बँकेकडून घेऊन कामगारांनाही अडचणीत आणण्याचा प्रकार झाला असल्याचे पत्रकात म्हटले आहे.

पत्रकावर अनिल औताडे,तालुका अध्यक्ष युवराज जगताप,सुदामराव औताडे, साहेबराव चोरमल, डॉक्टर दादासाहेब आदिक, डॉ. विकास नवले, शरद आसने, गोविंद वाघ, शरद पवार, प्रभाकर कांबळे, राजेंद्र कोकणे, विष्णुपंत खंडागळे, बंडू पटारे, दिलीप औताडे, शैलेश वमने, शिवाजी ताके, सतीश नाईक, तुषार ताके, दत्ता जानराव, शिवाजी दांगट, प्रभाकर पटारे, सुभाष पटारे, इंद्रभान चोरमल, कडू पवार आदींच्या सह्या आहेत.

## द•ख•ल

### मालुंजात आजपासून रेणुकामातेचा यात्रोत्सव



**श्रीरामपूर** : तालुक्यातील मालुंजा येथील जागृत देवस्थान रेणुका मातेची यात्रा उद्या (शनिवार) पासून सुरू होत आहे. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी यात्रोत्सव उत्साहात साजरा होणार असून यात्रेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. यात्रेसाठी गावातील तरुण गंगेचे पाणी आणण्यासाठी कावडी घेऊन रवाना झाले असून सकाळी कावडीने आणलेल्या गंगेच्या पाण्याची मिरवणूक निघून गावातील सर्व देवतांना या पाण्याने अभिषेक करण्यात येणार आहे. संध्याकाळी छबिना झेंडा मिरवणूक निघणार आहे. सकाळ -संध्याकाळ सुहासिनींकडून देवीची पूजा करण्यात येणार आहे. या जागरूक देवीचे माहूरगड येथील ठाणे असून परिसरातील नागरिकांची कुलस्वामीनी म्हणून ओळखली जाते. या काळात सकाळ-संध्याकाळ आरती व धार्मिक कार्यक्रम होणार आहे. आचारसंहितेचे पालन करून काही कार्यक्रम पुढे ढकण्यात आले आहेत. ही यात्रा नेहमीप्रमाणे तीन दिवस चालणार असून या काळात गावातील व परिसरातील बाहेरगावी नोकरीसाठी अथवा कोणत्याही कामासाठी गेलेले नागरिक यात्रेसाठी गावात येतात. नागरिकांनी धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा कमिटीने केले आहे.

### १ मे ला मराठी साहित्य संमेलन

**शिरसगाव** : भूमी फाउंडेशन संस्थेच्यावतीने १ मे ला २०२४ ऑनलाइन राज्यस्तरीय मराठी साहित्य कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. भूमी फाउंडेशनच्या राज्यस्तरीय मराठी साहित्य व कवी संमेलनाच्या चौथ्या अध्यक्षा म्हणून लेखक आनंद यादव यांच्या कन्या व साहित्यिका, मराठी अभ्यासिका व लेखक प्रा.डॉ. कीर्ती मुळीक यादव या भूषवणार आहेत, अशी माहिती भूमी फाउंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कैलास पवार यांनी दिली आहे. या राज्यस्तरीय मराठी साहित्य कवी संमेलनामध्ये कवींनी सहभाग घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### ...तर हे जनतेचे दुर्दैव; अ‍ॅड. पोळ यांचे प्रतिपादन

**कोपरगाव** : मागील पंधरा वर्षात ज्यांनी शिर्डी लोकसभा मतदारसंघात काही एक काम केले नाही, त्यांच्या करिता मतदारसंघातील नेते मते मागत असतील तर हे जनतेचे दुर्दैव आहे, असे मत बहुजन भारत पार्टीचे उमेदवार अ‍ॅड. नितीन पोळ यांनी व्यक्त केले.

पोळ म्हणाले की, शिर्डी लोक सभा मतदारसंघात आजी-माजी खासदार यांनी कोणतेही भरघोस व जनहिताचे काम केले नाही. कोणी लाटेवर, तर कोणी विविध पक्षाच्या वाटेवर निवडून गेले. शिर्डी मतदारसंघातील दस्तूर खुद्द त्यांच्याच पक्षातील कार्यकर्त्यांची कामे झाली नाही. आज या मतदारसंघातील आजी-माजी आमदार खासदार निवडून द्या, अशी मागणी करत आहे. मात्र मागील पंधरा वर्षात ज्यांच्याकरिता मते मागतो ते कधी कोणत्या कार्यक्रमात यांच्या सोबत दिसले नाही. मात्र युती आघाडीच्या नावाखाली आज या मतदारसंघातील नेते त्यांना मते द्या म्हणून मागणी करत आहेत. या उमेदवारांचे मागील पंधरा वर्षात विकासकामासाठी कोणतेही योगदान नसताना शिर्डी लोकसभा मतदारसंघातील आजी-माजी आमदार जर या निष्क्रिय उमेदवाराला मत द्या, असे म्हणत असतील तर ते नेत्यांबरोबरच जनतेचे दुर्दैव आहे

## गोदावरी नदीपात्रातून गौण खनिजाचे उत्खनन : वहाडणे





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : येथील गोदावरी नदीपात्रातून दिवसाढवळ्या मोठया प्रमाणात बेकायदा वाळूचा उपसा तसेच नदीकाठच्या दोन्ही बाजूने मोठया प्रमाणात पोयटा मातीचे उत्खनन सुरु असून, हे तातडीने बंद करावे अन्यथा बजरंग दलाच्यावतीने धडक आंदोलन करण्यात येईल असा इशारा तालुकाध्यक्ष संदीप वहाडणे यांनी दिला आहे.

पुणतांबा येथे मागील वर्षी वाळू विक्रीचा सरकारी डेपो सुरु करण्यात आला होता. मात्र चालू वर्षी अद्यापही हा डेपो सुरु करण्यात आला नाही. याबाबद आश्चर्य व्यक्त केले जात आहे. गौण खानिजाचे मोठया प्रमाणात उत्खनन केले जात असून याकडे महसूल विभाग व ग्रामसेवकाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आहे. येथील रयत हायस्कूलच्या पाठीमागे मुरूमाचे उत्कनन केल्यामुळे मोठ मोठे खड्डे पडले आहे तसेच चांगदेव महाराज मंदिराच्या पूर्वबाजूला अनेक ठिकाणी दिवसाढवळया मुरूम काढला जातो तसेच गावात व परिसरात अनेक ठिकाणी बेकायदा जुगारअड्डे, बेकायदा देशी व विदेशी दारूची विक्री, मटक्यसह अनेक प्रकारचे अवैध धंदे जोमात आहेत. या सर्व धंधाना येत्या ७ दिवसांत तातडीने आळा घालावा अन्यथा बजरंग दलाच्यावतीने राहाता तहसील कार्यालयासमोर धडक आंदोलन करण्याचा इशारा वहाडणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिला आहे.

## सर्वपक्षीयांची लढाई लढतोय : पोटे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : महाराष्ट्रामध्ये लक्षवेधी ठरणाऱ्या शिर्डी लोकसभा मतदारसंघात प्रहारचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पोटे यांनी शेतकरी संघटना पुरस्कृत अपक्ष उमेदवारी अर्ज भरलेला आहे. अर्ज भरल्यानंतर गावोगावी भेटीगाठी देत असताना अभिजीत पोटे बोलत होते.

प्रहार जनशक्ती पक्षातमध्ये कार्यरत असताना अनेक पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांसोबत गाठीभेटी होत होत्या. या दरम्यान अनेक कार्यकर्त्यांचे मनात होते की प्रस्थापित राजकीय पुढारी आपल्या सर्वांना तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष अशा प्रकारची पद देऊन वापरून घेतात. मात्र निवडणुकीच्या काळात आर्थिक सक्षम असणाऱ्या लोकांना उमेदवारी देतात. रस्त्यावरची लढाई लढणारे कार्यकर्ते मात्र जनसामान्यांच्या दुःखाची जाणीव असतानादेखील केवळ या राजकीय व्यवस्थेमुळे दूर राहतात म्हणून सर्व पक्षातील जिल्हाध्यक्ष व सर्व आघाडीवर काम करणाऱ्या वेगवेगळ्या पक्षात असले तरी दुःख मांडण्यासाठी उमेदवारी करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे समोर कितीही मोठी जनशक्ती असली तरी सर्व पक्षाने सांगितले तर यापुढे नेत्याच्या घरात नेता जन्माला न येता कार्यकर्ता नेता म्हणून निर्माण झाला पाहिजे. ही दुःख वेदना घेऊन जनतेच्या दरबारात सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या बळावर निवडणूक लढवण्याचे ठरवले आहे, असे पोटे म्हणाले. शेतकरी, कष्टकरी, ऊस उत्पादक, दिव्यांग बांधव, पाटपाणी, वीज या प्रश्नांवर गेल्या दहा वर्षापासून कार्यरत असताना गुन्हे दाखल झालेले आहे.

## मंत्री दादा भुसे यांनी नेवासा येथे साधला कार्यकर्त्यांशी सुसंवाद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शिर्डी लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे (शिंदे गट) उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारार्थ सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे यांनी नेवासा येथील शिवसेना व भाजप पदाधिकाऱ्यांशी सुसंवाद साधून प्रचाराच्या दृष्टीने आढावा घेतला.

यावेळीभुसे यांच्या समवेत शिवसेनेचे सचिव विक्रम चौधरी हेदेखील उपस्थित होते. यावेळी भाजप-सेनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा सत्कार केला. भुसे व विक्रम चौधरी यांनी श्रीखोलेश्वर गणपतीची पूजा करून दर्शन घेतले. यावेळी शिवसेनेचे जेष्ठ कार्यकर्ते अ‍ॅड. के. एच. वाखुरे, अ‍ॅड. भाऊसाहेब वाघ, जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार, उपाध्यक्ष बंडू शिंदे, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य निरंजन डहाळे, भाजपचे मनोज पारखे, आदिनाथ पटारे उपस्थित होते

## हजरत काजीबाबा यांचा ३ दिवस उरूस

### १ रोजी संदल; २ व ३ मे ला कव्वाल्यांचा कार्यक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील हजरत काजीबाबा यांचा १ ते ३ मे असा सलग तीन दिवस संदलसह बहारदार कव्वाल्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती संयोजक, माजी नगरसेवक हाजी मुजफ्फर शेख व उरूस कमेटीचे अध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष दिलीप नागरे आणि फतेह ग्रुपचे अध्यक्ष दानिश शेख यांनी दिली.

१ मे ला सायंकाळी ५ वाजता पैगंबरवासी पापा जलालभाई शेख यांच्या निवासस्थानासमोरून संदल कार्यक्रमास सुरुवात होणार आहे. २ मे ला सायंकाळी ६ वाजता सलमान अजमेरी आणि ३ मे ला युसुफ शोला व परवीन रंगीली यांचा कव्वाल्यांचा कार्यक्रम होणार आहे. आयुबभाई शेख चौकातील फतेह या उरूस मैदानावर हा कार्यक्रम होणार आहे. उरूस यशस्वीतेसाठी फतेह यंग सर्कल, सरकार ग्रुप, अल्बा ग्रुप, सुभेदार सोशल ग्रुप, अल्नुर युथ फौंडेशन, के.जी. एन. ग्रुप, एकता यंग सर्कल, संजेरी फ्रेंड ग्रुप, मौलाना आझाद युथ फौंडेशन, एस.के. ग्रुप, गरीब नवाज फौंडेशन, अल्कुरेश ग्रुप प्रयत्नशील आहेत.

उरूस निमित्त आयोजीत कव्वाल्यांचा भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एजाज इनामदार, लाल पटेल, हाजी राज मोहमद रुस्तुमभाई, बाबा इनामदार, पत्रकार हाजी शफीक बागवान, अश्फाक शेख, बरकतअली शेख, असलम बिन्साद, मेहबूब कुरेशी, संजय फंड, अशोक कानडे, आसिफ दारूवाला, श्रीनिवास बिहाणी, संजय छल्लारे, अ‍ॅड. सादिक शिलेदार, अ‍ॅड. तुषार चौदंते, अ‍ॅड. सौरभ गदिया अ‍ॅड. एजाज पठाण, इकबालभाई घडीवाले, रमजान शाह, गोरख साळुंखे, विकी शर्मा, शाहरुख बागवान, फिरोज मुलानी, विनोद गुप्ता, हाजी मतीन शेख, तनवीर पांडे, जयेश सावंत, अल्ताफ शेख, हमीद पटेल, गफार पोपटीया, राजू मिर्झा, फिरोज मुलानी, सलीम टर्नर, हाजी मतीन शेख, जाकीर जहागीरदार, रशीद पांडे, दिनमोहमद शेख, समीर खान, शाहिद कुरेशी, मुख्तार काझी, इरफान जीवनी, अजय कदम, मनोज गुप्ता, सागर घोरपडे, पप्पू खान, विकी शर्मा, आशिक अली, नाजीम पिरजादे आदींनी केले आहे.

## टाकळीभानच्या साईबाबा मंदिरात पारायण व शिवमहापुराण कथेस प्रारंभ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : येथील श्री. साई मंदिरात गुरूवारपासून (दि. २५) श्रीसाईचरित्र पारायण सोहळा व शिव महापुराण कथेस प्रारंभ झाला. त्याला भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे, २ मे पर्यंत हा सोहळा होणार आहे.

टाकळीभान येथे श्री संत साई बाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री. साईबाबा मंदिरात गुरुवर्य महंत भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीज महाराज, श्गुरुवर्य महंत रामगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने श्री संत साईबाबा प्रतिष्ठाण व समस्त ग्रामस्थ टाकळीभान यांच्या सहकार्यातून पारायण व शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथ पारायण व्यासपीठ चालक राधेश्याम महाराज पाडांगळे आहेत. रविंद्र महाराज गांगुर्डे, संदिप महाराज जाधव यांच्या



अधिपत्याखाली रामेश्वर महाराज (आळंदी) शिवमहापुराण कथा सांगत आहेत.यावेळी संदिप महाराज नरके (तबला), काशिनाथ महाराज टेकाळे (गायन) गौरव महाराज झुंजे, किशोर महाराज मोटकर (मृदुंग) पसायदान गुरूकुलच्या विद्यार्थिनी साथसंगत करत आहेत. दररोज पहाटे ५ वाजता काकडा भजन, सकाळी ७ वाजता श्रींची आरती व ग्रंथ पारायण, दुपारी आरती व त्यानंतर महाप्रसाद, सायंकाळी. ४ ते ५ हरिपाठ, सायं. ६ ते ९ शिवमहापुराण कथा होते. १ मे ला पालखी व ग्रंथ मिरवणूक होणार असून गुरूवारी (दि.२) राधेश्याम महाराज यांच्या काल्याचे कीर्तनाने सांगता होणार आहे. भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीसंत साईबाबा प्रतिष्ठाण, ग्रामस्थ, साईबाबा भक्त मंडळ, किसनगिरी बाबा भक्त मंडळ, पत्रकार संघ व भजनी मंडळ यांनी केले आहे.

## घोडेगावात वाहतुकीचा बोजवारा




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : संभाजीनगर-अहमदनगर महामार्गावरील घोडेगावातील चौकात शुक्रवारी सायंकाळी वाहतुकीचा अर्धा तास खेळ खंडोबा झाला असताना वाहतूक सुरळीत करण्यासाठी नेहमीप्रमाणे एकही पोलीस कर्मचारी हजर नसल्याने वाहनधारकांनी संताप व्यक्त केला. शुक्रवारी घोडेगाव येथील चौफुल्यावर चारी बाजूंनी वाहतूक कोंडी झाली. शुक्रवार हा घोडेगावचा बाजार दिवस असून यात्रेस सुरुवात झाली तसेच आगडगाव येथील पायी कावड यात्रा या मार्गावरून जात होती. एवढे सगळे असतानाही पोलिसांकडून कुठलाही बंदोबस्त ठेवण्यात आलेला नव्हता. सोनई-चांदा, अहमदनगर-संभाजीनगर महा मार्गावरून चौफुलीवर येणाऱ्या वाहनांची मोठी गर्दी झाली व जवळपास अर्धा तास वाहतूक खोळंबून राहिली. या घटनेची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आली. या वाहतूक कोंडीत सोनईकडून आलेली रुग्णवाहिका अडकल्याने ग्रामस्थांनी रुग्णवाहिकेला वाट करून दिल्याने काही प्रमाणात वाहतूक सुरळीत केली. या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक वैतागले होते. वाहतूक कोंडीची समस्या नेहमीचीच असल्याने वरिष्ठ अधिकारी याकडे जाणून-बुजून का दुर्लक्ष करतात असा सवाल ग्रामस्थांनी विचारला आहे.

## पदमश्री डॉ.विखे पाटील यांची आज ४४ वी पुण्यतिथी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : सहकारी साखर कारखानदारीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची उद्या (शनिवार) ४४ वी पुण्यतिथी साजरी होत असून, प्रवरा परिवाराच्यावतीने प्रवरा उद्योग समूहातील विविध संस्थांमध्ये त्यांना अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून लोणी बुद्रुक ग्रामस्थांनी कीर्तनाचे आयोजन केले आहे.

सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी आणि उपेक्षित घटकांना विकासाची संधी प्राप्त करून देणारे पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांची ४४ वी पुण्यतिथी प्रवरा उद्योग समूहात आज साजरी करण्यात येणार आहे.पद्मश्री डॉ.विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या वतीने प्रवरानगर येथे पद्मश्री विखे यांच्या समाधीस्थळी त्यांना अभिवादन करण्यात येईल.प्रवरा शिक्षण संस्था, प्रवरा मेडिकल ट्रस्ट, विविध सहकारी संस्था, महाविद्यालये आदी ठिकाणी अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.लोणी बुद्रुक ग्रामस्थांच्यावतीने सकाळी ९ वाजता पद्मश्री विखे पाटील यांना अभिवादन करण्यात येईल. त्यानंतर सायंकाळी ७ ते ९ या वेळेत श्रीराम मंदिर प्रांगणात दिनकर महाराज अंचवले (शेवगाव) यांचे कीर्तन होईल. यावेळी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे, जिल्हा बँकेचे संचालक अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, प्रवरा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र विखे, खा.डॉ. सुजय विखे, ग्रामस्थ व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## जाहीर प्रगटन

ज्या अर्थी श्री. अतिष आंबादास साळुंके रा. एकलहरे, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर यांचे कडील दिनांक ०१/०३/२०२४ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमुद केले आहे की, अर्जदार यांचे आजोबा नामे कै. भाऊराव अंबु साळुंके हे दिनांक ०१/०६/१९८३ रोजी राहते घरी एकलहरे, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर येथे मयत झालेले आहे. सदर अर्जदाराचे आजोबाचे मृत्युची नोंद त्यांना जन्म-मृत्यु कार्यालयात मिळून आलेली नाही. त्यामुळे त्यांनी सदर आजोबाचे मृत्युची नोंद सरकारी दप्तरी लावायची आहे. यासाठी त्यांनी दिनांक ०१/०३/२०२४ रोजी अर्ज दिला आहे.

उपरोक्त या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेला सुचित करण्यात येते की, वरील मृत्युचे दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरूपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित जन्माचा दाखला निर्गमित करण्यात येईल.

**तहसीलदार, श्रीरामपूर**

(पान १ वरून) (पान १ वरून)

## लोकसभेसाठी दुसऱ्या टप्प्यातील मतदान पुर्ण

पार्श्वभूमीवर अकोल्यात देखील सकाळपासून मोठ्या उत्साहात मतदानाला सुरूवात झाली. मतदारांनी आज सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मोठी गर्दी केली असून उन्हाचा तडाखा लक्षात घेता सकाळच्या सत्रात मतदान करण्यास मतदारांनी अधिक पसंती दिली आहे.परंतु, असे असताना मतदार यादीतील घोळ अद्याप कायम असल्याने अनेक मतदान केंद्रांवर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. तर काही मतदारांना आपले नाव मतदान यादीत आढळून न आल्याने, आल्या पावली माघारी जावे लागले. मात्र, या गोंधळाचा फटका मतदानाच्या टक्केवारीला बसला. तर दुसरीकडे वंचितच्या मतदारांची नावे जाणीवपूर्वक मतदार यादीतून गहाळ केल्याचा गंभीर आरोप या मतदारांकडून करण्यात आला.

विदर्भ आणि मराठवाड्यातील आठ मतदान केन्द्रावर आज मतदानाची रणधुमाळी रंगात आहे. अशातच अकोल्यात सकाळपासून मोठ्या उत्साहात मतदानाला सुरूवात झालीये. गेल्या काही दिवसांपासून आकोल्याती तापमानाने कमालीचा उच्चांक गाठला आहे. त्यामुळे उन्हाची दाहकता लक्षात घेता मतदारांनी सकाळच्या सुमारास मतदान केंद्रांवर मोठी गर्दी करत आपला हक्क बाजवण्याला पसंती दिली आहे. मात्र, अनेक मतदान केंद्रांवर मतदार यादीत नाव नसल्याने मतदारांना आल्या पावली माघारी जावे लागले.अकोल्यातील कृषीनगर भागातील मतदान केंद्रांवर हा घोळ मोठ्या प्रमाणात दिसत होता. सकाळपासून शेकडो मतदार यादीत नाव नसल्याने मतदानाला मुकले आहेत. कृषीनगर भागातच वंचितचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकराचं निवासस्थान असून हा भाग त्यांचा गड समजला जातो. परिणामी, वंचितच्या मतदारांची नाव जाणीवपूर्वक मतदार यादीतून गहाळ केल्याचा गंभीर आरोप या मतदारांनी केलाय. त्यामुळे मतदार यादीतील घोळ सलग दुसऱ्या टप्प्यातील निवडनुकांमध्ये कायम असल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

वाशिम शहरातील बाकलीवाल विद्यालयामधील असलेल्या बूथ क्रमांक २४३ या मतदान केंद्रावर ईव्हीएम बंद पडल्याचा प्रकार समोर आलाय. यामध्ये जवळ जवळ २० ते २५ मिनिटे मतदान प्रक्रिया बंद होती. त्यामुळे मतदारांनी संताप व्यक्त केला असून मतदान केंद्र निरीक्षकाला तक्रार करून वेळ का लागत आहे, असा जाब मतदारांनी विचारला. शेवटी बॅटरी बदलण्यात आल्यावर आता मशीन सुरू झाली. मात्र काहीकाळ मशीन बंद झाल्याने एकच गोंधळ त्या ठिकाणी झाल्याचे बघायला मिळाले.

परभणी लोकसभा मतदारसंघात दुपारी ३ वाजेपर्यंत ४४. ४९ टक्के मतदान झाले असून येथे कमाल तापमान ४१.०४ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले आहे. तर हिंगोली लोकसभा मतदारसंघात दुपारी तीन वाजेपर्यंत ४०. ५० टक्के इतका मतदान झाले आहे. तर हिंगोलीचं तापमान ४१ अंश सेल्सिअस वर पोहोचला आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये दुपारी तीन वाजेपर्यंत ४२. ४२ टक्के मतदान झाले आहे. यात भोकर येथे ४३.८५ टक्के, नांदेड उत्तर ४१.६९ टक्के, नांदेड दक्षिण ४४.३५ टक्के, नायगाव ४०.७९ टक्के तर देगलूर ४६.३० टक्के आणि मुखेड येथे ३७.५५ टक्के मतदान झाले आहे. तसेच नांदेड तापमान ४० अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले आहे.

## निलेश लंकेंच्या डमी उमेदवारीने नगरला ट्विस्ट!

ईव्हीएमसमोर भल्याभल्यांची धांदल उडते, यामुळे डमी उमेदवार असेल तर चुकून त्याला मतदान केले जाते. यापूर्वी शरद पवार, बाळासाहेब विखे पाटील यांच्याविरुद्धही असे डमी उमेदवार उभे केले गेले होते. रायगड लोकसभा मतदारसंघात अनंत गीते नावाचे दोन उमेदवार आहेत. तिथे २०१४ ला तसाच घोळ झाला होता. सुनिल तटकरे यांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या उमेदवाराने ११००० मते मिळविली होती, तर तटकरे २००० मतांनी पडले होते. त्यामुळे निलेश लंके यांना या दुसरे उमेदवाराचा फटका बसू शकतो, हे नक्की!

## हिवरे बाजार मॉडेल नेपाळमध्ये!

नेपाळमध्ये १२०० मि.मि.पाऊस पडूनसुध्दा पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागते.याउलट हिवरे बाजारमध्ये ४०० मी.मी.पाऊस पडतो तरीसुद्धा लोकसहभागातून पाण्याच्या ताळेबंदावर आधारित उत्तम प्रकारचे पिक व पाणी व्यवस्थापनमुळे पाणीटंचाई जाणवत नाही.

यावेळेस मिलिंद पानपाटील संचालक राष्ट्रीय जल अकादमी,एस. सेन्थिल सहा. संचालक राष्ट्रीय जल अकादमी यांचेमार्फत भेटीचे नियोजन करण्यात आले होते.नेपाळ देशातील टेक नाथ दहाल सहसचिव तसेच विविध खात्याचे अभियंते, कक्षप्रमुख व अर्थ विभागातील प्रमुख असे एकूण २६ व्यक्तीचा समावेश होता. प्रसन्न पवार , हबीब सय्यद यांनी हिवरे बाजार येथील कामांची माहिती दिली.

## ..तर ईव्हीएमच्या मायक्रोकंट्रोलरची पडताळणी होणार: सर्वोच्च न्यायालय

देण्यात आलेल्या स्लीपवर नोंदवले गेलेले मतदान यांची पडताळणी केली जाते.

न्यायमूर्ती दत्ता म्हणाले, प्रणाली किंवा संस्थांचे मूल्यमापन करताना समतोल दृष्टीकोन राखणे महत्वाचे आहे, परंतु प्रणालीच्या कोणत्याही पैलूवर आंधळेपणाने अविश्वास ठेवल्याने अनावश्यक संशय निर्माण होऊ शकतो. २४ एप्रिल रोजी या प्रकरणावर सुनावणी करताना खंडपीठाने म्हटले होते की ते निवडणुकांवर नियंत्रण ठेवू शकत नाही किंवा निर्देश जारी करू शकत नाही निकालांमध्ये फेरफार करण्यासाठी मतदान यंत्रांमध्ये फेरफार केला जाऊ शकतो, असा दावा याचिकांमध्ये करण्यात आला होता.

## वाकडीचा तरुण शेअर्स बाजारातील आंतरराष्ट्रीय फसवणुकीचा शिकार!

२१ मार्चला त्याच बँकेत १ लाख १० हजार आणि २२ एप्रिलला १ लाख रूपये जास्त परतावा मिळेल या आश्वासनाने गुंतवले. ३ एप्रिलला २ लाख १५ हजार रूपये एक्सिस बँक, कानपूर यामध्ये गुंतवले, असे एकूण ४ लाख ९० हजार रूपये गुंतवले. ६ एप्रिला त्यांना आलेल्या लिंकवर क्लिक केले असता सदर लिंकमध्ये डिटेल्स टाकले व पैसे त्यांच्या आयसीसीआय बँकेच्या खात्यावर वर्ग करण्याचा प्रयत्न केला. परंतु, पैसे काही अकौंटवर वर्ग झाले नाही. त्यामुळे त्यांनी लीना ग्रिफीत हिला टेलिग्राम चॅटींगमध्ये विचारले की, पैसे वर्ग होत नाही. तेव्हा तिने सांगितले की, तुम्हाला अजून पैसे भरावे लागतील. तेव्हा तुम्हाला तुमचा परतावा मिळेल. परंतु, त्यानंतर त्यांनी खात्यात पैसे भरले नाही. अशाप्रकारे श्री. लहारे यांना विश्वासात घेवून फसवणूक करण्यात आली आहे.

याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात श्री. लहारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शरीफसिंग, रा.लंडन, लीना ग्रिफीत (पत्ता माहीत नाही) यांच्याविरूद्ध भा. दं. वि. कलम ४०६, ४२०, माहीती तंत्रज्ञान सुधारणा अधिनियम २००८ चे कलम ६६ड प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी श्री. बेनिवाल करत आहेत.

# आरसीबीच्या पराभवाचे ग्रहण सुटले, हैदराबादवर मिळवला विजय





आयपीएल २०२४
**आफ्टर द मॅच**
**गिरीश कुलकर्णी**

तब्बल एक महिन्याच्या दीर्घ प्रतिक्षेनंतर अखेर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने सनरायझर्स हैदराबाद पराभवाचे ग्रहण सोडवले. सलग सहा सामन्यांत पराभवाचे तोंड पहाव्या लागलेल्या आरसीबीने या विजयाने थोडासा मोकळा श्वास घेतला असले. विशेष म्हणजे स्पर्धेत उच्चांकी धावसंख्या उभारणाऱ्या हैदराबादचा आरसीबीने त्यांच्या घरच्या मैदानावरच पराभव केला. नाणेफेक जिंकायची आणि पॉवरप्लेच्या पहिल्या सहा षटकात तुफान फटकेबाजी करायची आणि नंतर मोठी धावसंख्या उभारून प्रतिस्पर्धी संघावर दबाव टाकायचा, ही रननिती आरसीबीविरुद्धच्या सामन्यात वापरता आली नाही. कारण या सामन्यात नाणेफेक गमावल्यामुळे हैदराबादला प्रथम गोलंदाजी करावी लागली. आरसीबीने उभारलेल्या २०६ धावांचा पाठलाग करताना हैदराबादची फलंदाजी साफ कोसळली. लक्ष्याचा पाठलाग करताना येणारा दबाव त्यांचे फलंदाज पेलू शकले नाही व त्यांना ३५ धावांनी पराभव पत्करावा लागला. ट्रॅव्हस हेड, अभिषेक शर्मा, हेन्री क्लासेन ह चौकार आणि षटकारांची बरसात करणारे फलंदाज धावांचा पाठलाग करताना अपयशी ठरले. एकाही फलंदाजाल अर्धशतकापर्यंतही मजल मारता आली नाही. आतापर्यंतच्या सामन्यात आरसीबीची गोलंदाजी कुमकवत ठरली होती. मात्र हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात सर्व गोलंदाजांनी जीव ओतून गोलंदाजी केली. विराट कोहलीशिवाय रजत पाटीदार, कॅमरून ग्रीन, कर्णधार डुप्लेसी यांनी चांगली फलंदाजी केल्याने त्यांचा संघ जिंकला. संघातील सर्व ११ खेळाडूंनी चांगले योगदान दिले तर विजय मिळू शकतो, याचा धडा हैदराबाद विरुद्धच्या साममन्यातून आरसीबीने घेतला असेल. या मोसमातील हा त्यांचा फक्त दुसराच विजय आहे. उरलेले पाच सामने जिंकले तरी त्यांचे १४ गुण होतील आणि त्यांना प्लेऑफसाठी दुसऱ्या संघांच्या कामगिरीवर आणि धावगतीवर विसंबून रहावे लागणार आहे.

आरसीबीने विराट कोहली आणि रजत पाटीदार यांच्या अर्धशतकामुळे हैदराबादसमोर २०७ धावांचे आव्हान ठेवले होते आणि या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादची फलंदाजी कोसळली व बरोबर एक महिन्यानंतर आरसाबीने ३५ धावांनी विजय मिळवला.

विराट कोहलीच्या ४३ चेंडूंतील संथ ५१ धावा आणि रजत पाटीदारच्या २० चेंडूंतील आक्रमक ५० धावांच्या खेळ्या, तसेच शेवटच्या षटकांत पॅमरून ग्रीनने केलेल्या फटकेबाजीच्या जोरावर बंगळुरूने हैदराबादसमोर २०७ धावांचे आव्हान ठेवले होते. पण हैदराबादचे आघाडीचे ४ फलंदाज ५६ धावांत बाद झाल्यानंतर हे आव्हान डोंगराएवढे वाटू लागले आणि हैदराबादचा संघ २० षटकांत ८ बाद १७१ पर्यंत मजल मारू शकला. हैदराबादसाठी नेहमीच षटकारांची आतषबाजी करणारे ट्रव्हिस हेड (१), एडन मार्करम (७), हेन्रीक क्लासन (७) हे स्वस्तात बाद झाल्यानंतर हैदराबादसाठी कुणीच उभा राहिला नाही. कर्णधार पॅट कमिन्सच्या ३१ आणि शाहबाज अहमदच्या नाबाद ४० धावांनी हैदराबादच्या पराभवाचे अंतर कमी केले.तत्पूर्वी बंगळुरूने नाणेपक जिंकताच फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. विराट कोहली आणि फाफ डयु प्लेसिसची जोडी मैदानात उतरली आणि दोघांनी ४ षटकांत ४८ धावांची दमदार सलामी दिली. फाफने १२ चेंडूंत २५ धावा फटकावत आपली कामगिरी चोख बजावली. मग विल जॅक्स आला तसाच लवकर परतला. मात्र त्यानंतर कोहलीला रजत पाटीदारने ६५ धावांची भागी रचली. एकीकडे कोहली एकेरी-दुहेरी धावा काढत असताना पाटीदारने हैदराबादच्या गोलंदाजीला पह्डून काढले. त्याने ५ षटकार आणि २ चौकार ठोकत १९ चेंडूंत तर कोहलीने ३७ व्या चेंडूवर पन्नाशी गाठली. निर्धारीत २० षटकात आरसीबीने २०६ धावा केल्या. आरसीबीकडून कर्ण शर्मा व आयपीएलमध्ये पदार्पण करणारा स्वप्नील सिंग यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

## न्यूजीलंडचा पाकिस्तानवर चार धावांनी विजय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**लोहोर :** न्यूझीलंड व पाकिस्तान यांच्या सुरू असलेल्या टी-२० मालिकेतील चौथा सामना न्यूझीलंडने चार धावांनी जिंकला. पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने २० षटकांत ७ गडी गमावून १७८ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ २० षटकांत ८ गडी गमावून केवळ १७४ धावा करू शकला.

न्यूझीलंडकडून सलामीवीर टीम रॉबिन्सनने शानदार ५१ धावांची अधर्शशतकी खेळी केली. डीन फॉक्सक्रॉफ्टने २६ चेंडूत ३४ आणि टॉम ब्लंडेलने १५ चेंडूत २८ धावा केल्या. पाकिस्तानकडून अब्बास आफ्रिदीने सर्वाधिक ३ बळी घेतले.

१७९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने पॉवरप्लेमध्येच ३ गडी गमावले. फखर जमानने ६१ धावांची खेळी खेळली. पण संघाला विजयापर्यंत नेण्यात तो अपयशी ठरला. न्यूझीलंडकडून विल्यम ओरूर्कने सर्वाधिक तीन बळी घेतले. बेन सियर्सने दोन गडी बाद केले. कर्णधार मायकेल ब्रेसवेल आणि नीशम यांना प्रत्येकी एक गडी बाद केला.

## थोरात महाविद्यालयात २९ एप्रिलला वाणिज्य कार्यशाळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी अहमदनगर जिल्ह्यातील वाणिज्य शाखेच्या सर्व प्राध्यापकांकरीता सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २९ एप्रिलला एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील यांनी दिली.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रा. यशोधन मिठारे, प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. मनोहर सानप, डॉ. मंगेश वाघमारे मार्गदर्शन करणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण गायकवाड भूषवणार आहेत. सत्र अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. गोरक्षनाथ कलापुरे, प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर, डॉ. विजया गुरसळ, डॉ. भाऊसाहेब रणपिसेउपस्थित राहणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४ पंचवीस पासून नवीन शैक्षणिक धोरण लागू होणार असल्याने या कार्यशाळेमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भाने सविस्तर चर्चा होणार आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या सर्व प्राध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील व वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख प्रा .विजय बैरागी यांनी केले आहे.

## मतदार जागृतीसाठी रविवारी सायकल रॅली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**बीड :** जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या मार्गदर्शनातून स्वीप उपक्रमांतर्गत रविवारी (२८ एप्रिल) मतदान जागृतीसाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या सायकल रॅलीमध्ये जिल्हा प्रशासनाचे अधिकारी, कर्मचारी तसेच महसूल, पोलीस, जिल्हा परिषद सायकल संघटनेचे सदस्य यासह लायन्स क्लब, रोटरी क्लब, महिला सायकल संघटनेचे सदस्य सहभागी होणार आहेत. सामाजिक न्याय भवनपासून रॅलीला सुरुवात होईल पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून अण्णाभाऊ साठे चौक, सुभाष रोड, हिरालाल चौक, बलभीम चौक, बशीर गंज, सिव्हिल हॉस्पिटल, माने कॉप्लेक्स, नाट्यगृह, नगर नाका, भगवान बाबा चौक, जिजामाता चौक मार्गे रॅली पुन्हा सामाजिक न्याय भवन येथे येऊन तेथे समारोप होईल.

## डॉ. आंबेडकर क्रिकेट चषक बेलापूर संघाने जिंकला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टिळकनगर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त येथे आयोजित क्रिकेट स्पर्धे तील डॉ. आंबेडकर क्रिकेट चषक बेलापूर संघाने जिंकला. अंतिम सामना बेलापूर व खैरी निमगाव संघामध्ये खेळला गेला. या सामन्यात बेलापूर संघाने खैरी निमगाव संघावर एकतर्फी विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकविला. त्यांना २१ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात अलो. खैरी निमगाव संघास दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. त्यांना १५ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आलेय

स्पर्धेत अस्तगाव संघास तृतीय व दत्तनगर संघास चौथ्या क्रमांकाचे बक्षीस मिळले. बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले. भाजपचे श्रीरामपूर विधानसभा प्रभारी व राज्यसचिव नितिन दिनकर म्हणाले की,योग्य मार्गदर्शन व संधी मिळाल्यास भविष्यात चांगले खेळाडू निर्माण होतील. अध्यक्षस्थानी आरपीआयचे जिल्हा विभागीय स्पर्धेचे नियोजन ग्रामपंचायत सदस्य सिद्धार्थ बागुल व रविकांत त्रिभुवन यांनी केले. राकेश कापसे, सर्जेराव मुंढे, संजय ढोकचौळे, बाबासाहेब कटारनवरे, मयूर एडके यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी



रांजणखोलचे सरपंच बाळासाहेब ढोकचौळे, उपसरपंच चांगदेव ढोकचौळे, पत्रकार लालमोहंमद जहागीरदार, अशोकराव बोरगे, अरुण बागुल, किशोर निळे, शफी पठाण, गौतम निळे, बाळासाहेब हिवाळे, बाबासाहेब उबाळे, राजू त्रिभुवन, संदिप यादव, जाकिर शेख, सागर गुंजेकर, सुनील यादव, सलिम पठाण, शकिल पठाण उपस्थित होते. समालोचन व सूत्रसंचालन पी. एस .निकम यांनी केले तर सिध्दार्थ बागुल यांनी आभार मानले.



## मॉन्टेसरीच्या चिमुकल्यांचा पदवीदान समारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** कृतिशील शिक्षणासाठी ओळखल्या जाणाऱ्या अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूलच्या मॉन्टेसरी विभागाचा पदवीदान समारंभ दिमाखात झाला. संस्थेच्या विश्वस्त शरयू देशमुख, प्राचार्य अंजली कन्नावर उपस्थित होत्या. पदवीदान सोहळ्यात विद्यार्थ्यांची लक्षवेधी ठरलेली ड्रेपरी, त्यांनी केलेली भाषणे, सांगितलेले अनुभव आणि खेळीमेळीचे वातावरण हा सर्व पालकांसाठी एक संस्मरणीय अनुभव होता. देशमुख म्हणाल्या की, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी हे गुणवत्तेचे शैक्षणिक केंद्र ठरले आहे. निडो इंटरनॅशनल स्कूलमधून कृतीशील शिक्षणावर भर दिला गेला आहे. हसत खेळत शिक्षण ही संकल्पना राबवली जात असून परिपूर्ण विद्यार्थी घडवण्यासाठी काम केले जात आहे. प्राचार्य कन्नावर म्हणाल्या की, गुणवत्तेचे कृतिशील शिक्षण ही अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूलची ओळख ठरली आहे. यावेळी ओवी काटकरने सूत्रसंचालन केले. आर्वी सानप हिने स्वागताचे भाषण केले. मॉन्टेसरीच्या विद्यार्थ्यांनी गुडबायचे गाणे गाऊन समारंभाची सांगता केली.

## २१ वर्षीय युवकाचा अनोखा वाढदिवस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** येथील युवक श्रेयांस शिंगी याने आपला २१ वा वाढदिवस नेवासा खडका रस्त्यावर असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमात वृद्धांना मिष्टान्न भोजन देऊन साजरा केला. असा अभिनव उपक्रम राबवून सदर युवकाने युवा पिढीसमोर आदर्श निर्माण केला आहे.

वृद्धाश्रम प्रांगणात झालेल्या कार्यक्रम प्रसंगी व्यापारी राजेंद्र शिंगी, सपना शिंगी यांचा वृद्धाश्रमचे संपर्क प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण व संगीता चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वृद्ध मातांच्या हस्ते श्रेयांशचे औक्षण करण्यात आले. पत्रकार सुधीर चव्हाण यांना संत तुकडोजी महाराज



आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शिंगी परिवाराच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. वृद्धांना अन्नदान करून वाढदिवस साजरा करणे, त्यांचे आशीर्वाद घेणे ही प्रेरणा मला आई-वडिलांनी दिल्यामुळे येथे भोजन देऊन खऱ्या अर्थाने वाढदिवस साजरा केला याचे समाधान वाटते असे श्रेयांसने सांगितले. यावेळी उपस्थित वृद्धांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. .सपना शिंगी यांनी आई-वडिलांवर गीत सादर केले. यावेळी शिंगी परिवारातील सदस्य उपस्थित होते.वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर यांनी आभार मानले.

## 'अमृतवाहिनी'च्या ७२ विद्यार्थ्यांना अमृत मेरीटोरीयस शिष्यवृत्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** उच्च गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी असलेल्या समन्वयामुळे विद्यार्थ्यांना थेट नोकरीची संधी उपलब्ध करून देताना गुणवंत विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अमृत मेरीटोरीयस परीक्षेमध्ये ७२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली असल्याची माहिती विश्वस्त शरयू देशमुख यांनी दिली आहे.

अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमधील अमृत मेरीटोरीएस शिष्यवृत्ती वितरण सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम. ए.व्यंकटेश, संचालक डॉ. जे. बी. गुरव, प्रा.विजय वाघे, डॉ. एम. आर. वाकचौरे, प्रा. व्ही.वाय. पाटील आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

देशमुख म्हणाल्या की, माजी शिक्षण मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण देताना त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व संशोधन वृत्ती वाढावी यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. या संस्थेतील ग्रामीण भागातून आलेल्या अनेक विद्यार्थ्यांमध्ये मोठी गुणवत्ता असून त्या विद्यार्थ्यांना अमृत मेरीटोरीयसमधून शिष्यवृत्ती दिली जाते.

प्राचार्य व्यंकटेश म्हणाले की, महाविद्यालयात स्वतंत्र प्लेसमेंट कक्ष सुरू असून त्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विविध कंपन्या संस्थेमध्ये येऊन कॅम्पस इंटरव्यू घेत असतात यामधून अनेक विद्यार्थ्यांना थेट नोकऱ्या मिळत असून मागील वर्षी ४७६ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. एनबीए मानांकन, नॅक चा ए प्लस दर्जा, याचबरोबर आयएसओ मानांकन




यासह विविध ग्रेड संस्थेला मिळाल्या आहेत.शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील सहा महिन्यांसाठी सहा हजार रुपये मिळणार आहे.

प्रास्ताविक प्रा.व्ही.वाय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन मनीषा लांडगे यांनी केले तर डॉ. एम. आर. वाकचौरे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

# भाजपाच्या महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा शितल केदार यांना जीवे मारण्याची धमकी

## दहा आरोपींविरोधात शेवगाव पोलिसांत विनयभंगाचा गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील थाटे येथील गावच्या यात्रेनिमित्त ठेवलेल्या आर्केस्ट्रा या कार्यक्रमात लोकनियुक्त सरपंच तथा भाजपा महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा शितल परमेश्वर केदार व त्यांचे पती परमेश्वर केदार व सहकारी हे स्टेजवर नारळ फोडण्यासाठी गेले असता नारळ फोडून स्टेजवरून खाली उतरत असताना गावातीलच काही जणांनी संगणमत करून गैर कायद्याची मंडळी एकत्र जमवून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून तुम्ही सरपंच झाल्यापासून तुम्हाला जास्त झाले आहे.

आमच्या नादी लागला तर तुला व तुझ्या पतीला जिवे मारून टाकू अशा प्रकारची धमकी दिल्याने शेवगाव पोलिसात दहा जणाविरोधात विविध कलमासह विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. थाटे गावच्या लोकनियुक्त सरपंच तथा भारतीय जनता पार्टीच्या



महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा शितल परमेश्वर केदार यांनी शेवगाव पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मी थाटे गावची सरपंच असून गुरुवार दि. २५ रोजी रात्री ०९:४५ च्या सुमारास गावच्या यात्रेनिमित्त आर्केस्ट्रा लावला होता. त्याचे उद्घाटन करण्यासाठी मी व आमचे गावातील यात्रा कमिटीचे धर्माजी दामोदर केदार, परमेश्वर जालिंदर केदार, दादासाहेब रावसाहेब सातपुते, यांच्यासह आदी सहकाऱ्यासोबत स्टेजजवळ गेलो होतो. त्यावेळी मी नारळ फोडून स्टेजवरून खाली उतरत असताना सुधीर निवृत्ती जायभाय हा माझ्या पाठीमागे येऊन त्याने वाईट भावनेने मला पाठीमागून कवळ टाकून मला लज्जा उत्पन्न पण होईल असे वर्तन केले व मला ढकलून दिले त्यावेळी त्याने व तेथे हजर असलेले भागवत निवृत्ती जायभाय, ज्ञानेश्वर भाऊसाहेब केदार, तुकाराम भाऊसाहेब केदार, संतोष अंबादास केदार, पांडुरंग माणिक केदार, संभाजी अंबादास केदार, प्रमोद रोहिदास केदार, देवेंद्र बाळू जायभाय, महेश पांडुरंग केदार सर्व राहणार थाटे यांनी मला व माझे पती परमेश्वर यांना घाणघाण शिवीगाळ करून तुम्हाला सरपंच झाल्यापासून खूप जास्त झाले आहे तुम्ही आमच्या पुन्हा नादी लागला तर तुला व तुझ्या पतीला जीवे मारून टाकू अशी धमकी दिली आहे. त्यानुसार दहा जनाविरोधात शेवगाव पोलिसात भारतीय दंड संहिता कलम ३५४, १४३, १४७,१४९, ३२३, ५०४, ५०६ अंतर्गत विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लोहसरचा हंगामा निकाली कुस्तीने गाजला; आ. कर्डिले यांची पंचगिरी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** लोहसर ता. पाथर्डी येथे झालेल्या तीन दिवसीय काळभैरवनाथ यात्रा उत्सवाची सांगता निकाली कुस्त्यांनी झाली. चितपट कुस्त्यां व माजी आमदार शिवाजी कर्डिले यांची कुस्ती पंच म्हणून कामगीरीने कुस्ती प्रेमींची डोळ्याचे पारणे फेडले.

लोहसर ता. पाथर्डी येथे सालाबाद प्रमाणे तीन दिवसांचा भैरवनाथ देवस्थानतर्फे लोहसर यात्रोत्सव आयोजित केला जातो. यावेळी कावड मिरवणूक, रात्री छबिना दुसऱ्या दिवशी करमणूक कार्यक्रम व तिसऱ्या दिवशी लकी ड्रॉ आणि कुस्त्याचा हंगामा पार पडतो. यावर्षी यात्रा मोठ्या उत्साहात भरली होती मात्र दोन दिवस आलेल्या अवकाळी पावसाने भक्तांची काही प्रमाणात तारांबळ उडाली. मात्र तिसऱ्या दिवशी झालेल्या कुस्त्याच्या हंगाम्याने प्रेक्षक समाधानी झाले. लोहसर येथील कुस्त्यांचा हंगामा तालुक्यात नावाजलेला असल्याने जिल्हाभरातूनच नव्हे तर दुसऱ्या राज्यातूनही येथे मल्ल कुस्त्यासाठी येत असतात. यावर्षी महिला मल्लांची उपस्थिती मोठी होती. एक हजारापासून

> शिस्तबद्ध हंगामा म्हणून लोहसर चे नाव आहे. त्यामुळे नामवंत मल्ल येथे हजेरी लावतात.
>
> **–रोहित बाळासाहेब घोरपडे**
> **( मल्ल ,अहमदनगर )**

सुरू झालेल्या या कुस्त्या ५१ हजार पर्यंत गेल्या. चितपट कुस्ती तथा निकाली कुस्ती लोहसर चे वैशिष्ट्य असल्याने प्रेक्षकही आवर्जून येतात. गुरुवारी झालेल्या कुस्त्यांचे माजी आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी शेवटच्या पाच कुस्त्यांसाठी पंच म्हणून काम केले. अनेक नामांकित मल्लांना स्वतः तर्फे कर्डिले यांनी बिदागीही दिली. झटपट कुस्ती आणि जास्तीत जास्त बिदागी ही या लोहसर हंगाम्याचे वैशिष्ट्य असल्याचे श्री काळभैरवनाथ देवस्थान समितीचे अध्यक्ष व सरपंच अनिल गीते यांनी सांगितले. नगर, बीड ,आष्टी , नाशिक तसेच झारखंड येथून या मल्लांनी यावेळी उपस्थिती दर्शविली. सुरेश चव्हाण ,रावसाहेब वांडेकर , राजेंद्र दगडखैर ,देवेंद्र गीते , डॉक्टर दिलीप गीते आदि देवस्थान समितीच्या सदस्यांनी यात्रेचे नियोजनासाठी परिश्रम घेतले.



# नृत्य स्पर्धेत नागवडे स्कुलच्या विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** :भारतीय सांस्कृतिक कला नृत्यभारत महोत्सव यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या १२ व्या राष्ट्रीय नृत्य महोत्सव २०२४ स्पर्धा नुकत्याच प.भीमसेन जोशी कला मंदिर औंध, पुणे येथे संपन्न झाल्या.सदर राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये शिवाजीराव नागवडे डेफोडिल्स स्कूलच्या संघाने सहभाग घेत मनमोहक आणि दिलखेचक नृत्य आविष्कार सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध करत बक्षिसांची लयलूट केली.

विजेते विद्यार्थी पुढीलप्रमाणे –छोटा गट – प्रथम क्रमांक (इंडियन फोक डान्स) प्रसन्ना गोलांडे, ओवी सुपेकर, शिवाज्ञा नागावडे, प्रांजल मोरे, मिहिका बायकर.

सब जुनिअर गट (हिप हॉप) उत्तेजनार्थ आयुश्री डोळे, दिक्षा ढवळे, ईश्वरी कचरे, निखिल निकम, कार्तिकी पवार

जुनिअर गट – तृतीय क्रमांक (नटरंग– इंडियन फोक डान्स) अपूर्वा शेळके, आद्या गिरमे, प्रज्ञा शिंदे, कार्तिकी शेलार, सौम्या सस्ते, शरयू लोंढे, कार्तिकी पवार, जल पटेल, शरण्या पवार, अनन्या ढगे, मंजिरी लोहगावकर, अंजली पाटील, श्रुती आढाव, श्रुतिका पाचपुते, समीक्षा गायकवाड.

सोलो डान्स – प्रज्ञा शिंदे द्वितीय – हीप हॉप, श्रेया बडवे – कंटेप्ररी उत्तेजनार्थ

यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे डान्स कोरिओग्राफर सुमेध व प्रणाली गजभिये यांचे मार्गदर्शन लाभले.प्रसंगी प्रणाली गजभिये यांना गुरू विभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या दैदीप्यमान कामगिरी बद्दल तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, विश्वस्त अनुराधा ताई नागवडे, निरीक्षक एस.पी.गोलांडे सर, मुख्याध्यापिका नीतू दुलानी मॅडम यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# पाझर तलाव बुजवणाऱ्यांवर कारवाई करा : अशोक धनवडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शहरातील शासकीय वनजमिनीत असलेला पाझरतलाव बुजवून त्याचे अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न होत असून, हे कृत्य करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी येथील कार्यकर्ते अशोक धनवडे यांनी जिल्हाधिकारी व संबधितांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शेवगाव शहरातील गट नं. १०४३/३ व १०४५ मध्ये शासकीय वन जमीन असून, तेथे शासनाच्या रोजगार हमी योजनेंतर्गत सुमारे ७० वर्षापूर्वी पाझर तलाव घेण्यात आलेला आहे. पावसाळ्यात या तलावात पाणी साचल्यानंतर परिसरातील शेतकरी व नागरिकांना त्याचा लाभ होत होता. दरम्यान, ही जमीन पंचायत समितीत सेवेत असलेल्या एका व्यक्तीने अज्ञात इसमास विकली असून, त्यांनी सदर जमिनीची लेव्हल करताना हा तलाव विना परवानगी डबर व मुरुमाच्या सह्याने बुजवण्याचे काम सुरु केले आहे. हा मुरूम उत्खनन करताना परवानगी घेतलेली आहे काय ? असल्यास किती ब्रासची परवानगी घेतली आहे, याची माहिती द्यावी व पाझरतलाव बुजवण्याचे काम थांबवावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा धनवडे यांनी निवेदनात दिला आहे.

# मारुती मंदिराच्या उत्कृष्ट गाभाऱ्यासाठी लाळगे कन्ट्रक्शनचे योगदान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : निघोज येथील मारुती मंदीरातील उत्कृष्ट स्टील आणी काचेच्या माध्यमातून तयार केलेल्या गाभाऱ्यासाठी डी बी लाळगे कंट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे यांनी मोठे योगदान दिले असून यासाठी डी बी लाळगे कंट्रक्शनने १ लाख ९२ हजार रुपये खर्च केला असून याबद्दल पवनपुत्र हनुमान मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक राजेंद्र उनवणे, पदाधिकारी लहू गागरे, नाभिक समाजाचे शहर उपाध्यक्ष नाना राउत , महादेव उचाळे, मंगेश काळे यांनी पवनपुत्र हनुमान मंडळ तसेच ग्रामस्थ यांच्या वतीने मळगंगा कंट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे यांचा सत्कार केला आहे. लाळगे हे मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त असून निघोज व परिसरातील विविध संस्थांच्या माध्यमातून ते कार्यरत आहेत. डी बी लाळगे कंट्रक्शन कंपनी अंतर्गत ते कार्यरत असून लोकाभिमुख विकासासाठी कार्य करीत असलेल्या विविध विकास कामांमध्ये त्यांचे योगदान मोठे आहे.पवनपुत्र हनुमान मंडळाची स्थापना गेली पंधरा वर्षांपूर्वी येथील नवी पेठेतील व्यापारी व व्यावसायिक बंधूंनी केली तेव्हापासून या मंदीराची सकाळ, संध्याकाळी पुजा विधी तसेच अभिषेक व आरती करण्यासाठी परिसरातील ग्रामस्थ या मंडळाच्या माध्यमातून प्रयत्नशील असतात. या मंदीराचे नुतनीकरण करण्यासाठी पवनपुत्र हनुमान मंडळ तसेच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट तसेच ग्रामस्थांनी लोकसहभागातून मोठी मदत केली आहे. या मारुती मंदीरातील मारुतीच्या भोवतीचा लोखंडी गाभारा अत्यंत जुना झाल्याने खराब झाला होता. डी बी लाळगे कंट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे, संचालक सागरशेठ लाळगे यांनी एक दिवस याची पाहणी केली तसेच पवनपुत्र हनुमान मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक राजेंद्र उनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा केली व कशाप्रकारे गाभारा अपेक्षित आहे याची माहिती घेतली त्याप्रमाणे लाळगे यांनी शिरुर व पुणे येथील नामांकित कारागीरांशी चर्चा करुन अतिशय सुसज्ज तसेच स्टिल व काच यांचा गाभारा तयार करून घेतला. व नुकताच हा गाभारा श्रीराम भक्त हनुमान यांच्या चरणी अर्पण केला. याबद्दल निघोज ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, पवनपुत्र हनुमान मंडळ तसेच पारनेर तालुका पत्रकार संघ मराठी पत्रकार संघ यांनी डी बी लाळगे कंट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे, संचालक सागरशेठ रसाळ व त्यांच्या कुटुंबीयांचे कौतुक करीत धन्यवाद व्यक्त केले आहे.

पुढे प्रतिक्रिया देताना लाळगे म्हणाले की, धार्मिक संस्कृती वाढविण्यासाठी आपण सदासर्वदा प्रयत्नशील असून मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट माध्यमातून आपण विश्वस्त म्हणून भुमिका यथायोग्य पार पाडीत असून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक कार्यात आपल्याला काम करण्याचा आनंद मिळत असून ती एक प्रेरणा आहे. गेली पन्नास ते साठ वर्षांच्या कार्यकाळात या गाव व परिसरातील ज्येष्ठ मंडळींनी मंदीर बांधकाम करीत जी धार्मिक संस्कृती जतन करण्यासाठी प्रयत्न केले त्यांचे अनुकरण करणे ही मळगंगा मातेची खऱ्या अर्थाने सेवा आहे.

# उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची सोय

## पक्ष्यांना वाचविण्यासाठी भालसिंग यांचा पुढाकार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर** : उन्हाळ्यात वाढलेले तापमान व पक्ष्यांना जगणे सुसह्य व्हावे म्हणून वाळकी (ता. नगर) गावात सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांनी झाडांवर पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची सोय करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. भालसिंग गाव परिसरात ठिकठिकाणी हा उपक्रम राबवून पक्ष्यांचे जीव वाचविण्यासाठी सरसावले आहे.



दिवसं-दिवस उन्हाची तीव्रता वाढत असताना ३८ अंशापेक्षा अधिक तापमानाची नोंद होत आहे. पक्षी पाण्यासाठी व अन्नासाठी भटकंती करीत आहे. वाढत्या तापमानात पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याने अनेक पक्ष्यांना जीव गमवावा लागत आहे. ही जाणीव ठेऊन विजय भालसिंग यांनी गावातील शेत परिसरात झाडांवर धान्य व पाण्याची भांडी टांगून पक्ष्यांची सोय केली आहे. पक्षी हे नैसर्गिक चक्राचा घटक असून, त्यांना जगविणे ही मनुष्याची नैतिक जबाबदारी आहे. पक्षांना वाचवण्यासाठी सर्वांना जबाबदारी घ्यावी लागणार आहे. झाडावर, घराच्या गच्छीवर व गॅलरीत पक्ष्यांच्या पाण्याची व धान्याची व्यवस्था करण्याचे आवाहन भालसिंग यांनी केले आहे.

# त्रिमूर्ती महाविद्यालयात मतदान जनजागृती



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ढोरजळगावने येथे मतदान जनजागृती उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ किशोर धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा संदीप घोडेचोर म्हणाले की, महाविद्यालयीन तरुण मतदार विद्यार्थ्यांनी मतदानातून आपल्या सक्रिय सहभागाच्या आधारे व आपली संविधानिक जबाबदारी पार पाडून लोकशाही मजबूत करण्याचा संकल्प केला पाहिजे. सध्या मतदानाविषयी वाढणारी उदासीनता व मतदाराची घसरणारी आकडेवाडी चिंताजनक आहे सशक्त लोकशाहीसाठी मतदार राजाने जागे होऊन लोकशाहीचा धागा बनले पाहिजे व आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानासाठी प्रतिज्ञा देण्यात आली. व ढोरजळगावने ते ढोरजळगाव शे गावांमध्ये मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली.तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमातून गावातील सुजान नागरीकांच्या मतदान जनजागृती साठी प्रतिक्रिया घेऊन मतदानासाठी मतदारांना प्रोत्साहीत करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा रजणिकांत पावशे यांनी केले. या मतदार जनजागृती फेरीत प्राध्यापक , कार्यालयी व विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग घेतला .उपस्थितांचे आभार प्रा नवनाथ रक्टे यांनी मांडले. प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा प्रदिप नवल यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा रजणिकांत पावशे यांनी केले. प्रा सनोबर शेख , प्रा निशा संगभोर , प्रा कविता बर्डे ,प्रा नंदा कराड , प्रा पुनम घाडगे ,प्रा . आकाश वाघ , प्रा सचिन फोफळे , प्रा कपिल चाबुकस्वार , प्रा कृष्णा पाडळे , प्रा . स्वामी शेटे , श्री लिंबोरे आदीसह विद्यार्थि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द•ख•ल

### स्वच्छ जीवन जगायचे असेल तर झाडे लावली पाहिजेत : शिंदे

**लिंपणगाव** : पत्रकार, साहित्यिक , सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंदे यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदुषण निवारण मंडळ (महाराष्ट्र)या संस्थेच्या अहमदनगर जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल डॉ.संजय कोकाटे ,प्रगतशील शेतकरी रवी कोकाटे यांच्या हस्ते त्यांचा येथोचित असा सन्मान केला. यावेळी संतोष शिंदे म्हणाले की सद्या पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. ग्रामीण भागात वृक्षतोड मोठ्या प्रमाणात झाल्याने तापमानाचे प्रमाण ४० ते ५० ओल पर्यंत गेले आहे.भविष्यात ही तापमान वाढ थांबवायची असेल आणि स्वच्छ जीवन जगायचं असेल तर झाडे लावली पाहिजेत, घनकचरा जाळून न टाकता मातीमध्ये कुजवला पाहिजे म्हणजे प्रदूषण होणार नाही. यावेळी डॉ.संजय कोकाटे म्हणाले की ग्रामीण भागातील लहान मोठ्या घटनांचा बारकाइने अभ्यास करून त्या घटना वाचकांपर्यन्त पोहोचविण्याचं अत्यंत महत्वाचं काम गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकार संतोष शिंदे करत आले आहेत.त्यांना निसर्गाची आवड आहे वृक्षसंवर्धन व पर्यावरण , प्रदुषण संदर्भात त्यांनी दर्जेदार लेखन केले आहे.यावेळी प्रगतशील शेतकरी रवी कोकाटे उपस्थित होते.

### नूतन बँक व्यवस्थापक शर्मा यांचा सन्मान



**शहरटाकळी** : शेवगाव तालुक्यातील सुमारे २० ते २२ वीस गावांचे कार्यक्षेत्र असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा शहरटाकळीच्या बँक मॅनेजर पदी मा. नितीन शर्मा नव्याने रजू झाले असून त्यानिमित्त त्यांनी पदभार स्वीकारला आहे , नूतन बँक मॅनेजर शर्मा यांचा ग्राहक ,ग्रामस्थ व हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान च्यावतीने रामचंद्र गिरम ,शेषराव आपशेटे, प्रदीप मडके , डॉ. जितेंद्र गांधी ,मानियल कोल्हे, पत्रकार रविंद्र मडके, संदीप गादे, सोमनाथ लध्दे ,संतोष हत्ते सह ग्रामस्थांनी सन्मान केला, यावेळी सेंट्रल बँक कृषी मॅनेजर राम शिंदे साहेब, योगेश बागलोम, कॅशियर सिकंदर शेख, शिवप्रसाद सिंग, सोमनाथ गिरम स ग्राहक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अशोक खरमाळे यांना छत्रपती संभाजी पुरस्कार जाहीर

**नगर** : सामाजिक व बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल अशोक नामदेव खरमाळे यांना श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त राज्यस्तरीय पाचव्या काव्य संमेलनचे आयोजन करण्यात आले आहे. या काव्य संमेलनात पाहुण्यांच्या हस्ते खरमाळे यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती काव्य संमेलनाचे आयोजक तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे व श्री नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदीप डोंगरे यांनी दिली. नांदगाव (ता. नगर) येथील अशोक खरमाळे यांचे विविध सामाजिक क्षेत्रात कार्य सुरु आहे. निस्वार्थ भावनेने ते सामाजिक कार्यात योगदान देत आहे. तर बँकिंग क्षेत्रात देखील त्यांचे उत्कृष्ट कार्य सुरु आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना छत्रपती संभाजी महाराज गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### सेंट जॉन्स चर्चच्या मैदानावर फुटबॉल स्पर्धेला प्रारंभ



**नगर** : भिंगार येथील सेंट जॉन्स चर्चच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉन बॉस्को कप फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन रेल्वे पोलीस अधीक्षक तुषार डोशी यांच्या हस्ते झाले. या फुटबॉल स्पर्धेत जिल्ह्यातील फुटबॉल संघांनी सहभाग नोंदवला असून, चर्चच्या मैदानात फ्लड लाईटमध्ये स्पर्धेचा थरार रंगत आहे. पोलीस अधीक्षक डोशी यांनी मैदानात नारळ वाढवून व फुटबॉलला किक मारुन स्पर्धेला प्रारंभे केले. सेंट जॉन्स चर्चचे फादर विश्वास परेरा, जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद आदींसह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.तुषार डोशी यांनी सेंट जॉन्स चर्चच्या वतीने खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने घेण्यात येणाऱ्या फुटबॉल स्पर्धेचे कौतुक केले. तर युवकांनी आरोग्यासाठी मैदानावर येण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फादर विश्वास परेरा म्हणाले की, सेंट जॉन्स चर्च फुटबॉल स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांना घडविण्याचे काम करत आहे. विविध स्पर्धा घेतल्या जात असल्याची माहिती त्यांनी दिली. मनोज वाळवेकर म्हणाले की, सर्व युवक फक्त फुटबॉलच्या नाट्यमयतेचे साक्षीदार होण्यासाठी जमले नसून, डॉन बॉस्को यांनी आयुष्यभर उत्कटतेने प्रोत्साहित केलेल्या तरुणाईच्या जिव्हाळ्याचा, संघटनाशीलतेचा आणि क्रीडाधर्माचा उत्सव साजरा करण्यासाठी एकत्र आलेले आहेत.

# पुरंदरमध्ये इंडिया आघाडीला मताधिक्य देऊ : आ. जगताप

**माळशिरस :** पुरंदर उपसा जलसिंचन योजना व जानाई शिरसाई जलसिचन योजनेमुळे पुरंदरमध्ये हरित क्रांती झाली आहे. या परिसरातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावला आहे या कामी देशाचे माजी कृषीमंत्री शरदरावजी पवारसाहेब यांचे योगदान मोठे आहे. म्हणूनच इंडिया आघाडीचे उमेदवार संसद रत्न सुप्रियाताई सुळे यांना पुरंदर विधानसभा मतदारसंघातून प्रचंड मताधिक्य देऊ असा विश्वास पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी सक्रिय व्हावे असे आवाहन त्यांनी केले बेलसर माळशिरस जिल्हा परिषद मतदार संघातील कार्यकर्त्यांचा मेळावा पारगाव येथे आयोजित केला होता त्यावेळी ते बोलत होते. मेळाव्यात कार्यकर्त्यांनी बुथ कमिटीच्या नियोजनाबद्दल सूचना केल्या तसेच बुथ कमिटीच्या कार्यकर्त्यांना राऊत यांनी प्रशिक्षण दिले या प्रसंगी राष्ट्रवादीचे प्रवक्ते विकास लवांडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयराव कोलते, मेमाणे यांनी स्वागत केले.

मतदानावर बहिष्कार

# नागरिकांनी फ्लेक्स लावून दिला संदेश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

> भैरवनाथ नगरच्या ग्रामस्थांना अनेक वर्षापसून मागणी करूनही कोणत्या सुविधा मिळाल्या नसून अनेकदा मागणी करूनही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने या पुढील काळात जोपर्यंत आम्हाला सर्व जीवनावश्यक सुख सुविधा मिळत नाही तोपर्यंत सर्व निवडणुकीवर आम्ही बहिष्कार टाकत असून ग्रामपंचायत कोणताच कर भरणार नाही.
>
> **प्रकाश कांबळे, ग्रामस्थ**

**तळेगाव ढमढेरे :** तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथील भैरवनाथ नगर भागात शासनाच्या शासकीय घरकुल योजनेतून घर मिळालेल्या नागरिकांना १९७३ पासून भौतिक सुख सविधा मिळत नसल्याने येथील नागरिकांनी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकत असल्याचे याबाबतचे फ्लेक्स गावातील मुख्य ठिकाणी लावल्याने खळबळ उडाली आहे.

तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथील भैरवनाथ नगर परिसरात सण १९७३ पासून घरकुल योजनेच्या माध्यमातून मोठी लोकवस्ती निर्माण झाली असताना देखील गेली पन्नास वर्षापासून या भागातील नागरिक मुलभूत सुख सुविधांपासून वंचित आहे. नागरिकांना मुख्य रस्ता, अंतर्गत रस्ता, पाणी, पथदिवे, गटार लाईन या सुविधा अनेक वर्षापसून मागणी करून देखील मिळत नसल्याने कंटाळून येथील नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला असून याबाबतचे फ्लेक्स देखील गावातील मुख्य ठिकाणी लावले आहे. भैरवनाथ नगर मध्ये तीनशेच्या आसपास मतदार असून स्थानिक प्रशासना सह तालुका व जिल्हा प्रशासनाला वारंवार विनंती करून सुद्धा या लोक वस्तीकडे दुर्लक्ष केले जात असल्याने ग्रामस्थांनी हा निर्णय घेतला असून जोपर्यंत आवश्यक सर्व सुखसुविधा उपलब्ध होत नाही तोपर्यंत कोणत्याही निवडणुकीला मतदान करणार नाही व ग्रामपंचायतचा कोणताच कर भरणार नाही असे देखील येथील ग्रामस्थ व नागरिकांनी सांगितले आहे.



तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथील भैरवनाथ नगर भागातील नागरिकांनी निवडणूक बहिष्कार बाबत लावलेला फ्लेक्स.

# मिरवणुनिकीव्दारे आढळरावांनी साधला मतदारांशी संवाद

## विजयाचा निर्धार करत शेकडो कार्यकर्ते मिरवणुकीत सहभागी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**शिरुर :** शहरातील महायुतीच्या सर्व घटक पक्षांनच्या कार्यकर्त्यांनी वारा पावसाची तमा न बाळगता जि भव्य जंगी मिरवणुक शिरुर शहरातुन काढली ते मि उद्याच्या विजयाचे प्रतिक समजतो असे मत महायुतीचे शिरुर लोकसभेचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी व्यक्त केले . महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचाराच्या निमित्त शिरुर शहरातुन दिनांक २४ रोजी सायंकाळी भव्य अशी मिरवणुक काढत आढळराव यांनी मतदारांशी संवाद साधला छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालुन मिरवणुकीस सुरवात झाली सुसाट वारा, पाउस अशा वातावरणात शेकडो कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या समवेत पुना नगर रोड, मारुती आळी, सरदार पेठ, सोनार आळी, सुभाष चौक, डंबेनाला, कापडबाजार अशा मार्गाने हि मिरवणुक काढण्यात आली. ठिकठिकाणी आढळराव यांचे नागरिकांनी स्वागत केले. या वेळी भाजप ज्येष्ट नेत्या जयश्री पलांडे, पुणे मध्यवर्ती बँकेचे संचालक प्रदीप कंद, जिल्हा नियोजन समिती सदस्य राहुल पाचर्णे ,भाजप पुणे जिल्हा उपाध्यक्ष ड धर्मेंद्र खांडरे, घोडगंगा कारखान्याचे संचालक दादापाटील फराटे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष रविंद्र काळे, शहरअध्यक्ष शरद कालेवार, भाजप तालुका अध्यक्ष आबासाहेब सोनवणे, शहरअध्यक्ष नितीन पाचर्णे, शिवसेना तालुकाअध्यक्ष रामभाउ सासवडे, शहर प्रमुख मयुर थोरात, रंजन झांबरे, एजाज बागवान, श्रुतीका झांबरे, सुरेश गाडेकर, निलेश नवले, अमोल वर्पे, अभिजीत पाचर्णे, मनसेचे उपजिल्हाप्रमुख महिबुब सय्यद, तालुका संघटक अविनाश घोगरे, शहर अध्यक्ष आदित्य मैड आदी सह शेकडो कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

या वेळी आढळराव म्हणाले कि मि अनेक निवडणुका लढलो पण आजच्या मिरवणुकीतील उत्साह पाहता शिरुर शहर, पंचक्रोशी, ग्रामीण भागातुन ८० टक्क्या पेक्षा जास्त मतदान होईल मला होईल अशी मला खात्री आहे .देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा विराजमान होणार आहे त्या मुळे त्यांच्या विचारांचा खासदार संसदेत जाणे गरजेचे असुन आपण गेल्या वेळेस जि चुक केली चुकीचा माणुस निवडुन दिला विरोधी पक्षाचा माणुस दिल्यामुळे मतदार संघाचे नुकसान होउन मतदार संघ पाच वर्ष मागे गेला एक रुपयाचा निधी या मतदार संघात आणला नसल्याचा आरोप या वेळी आढळराव यांनी केला .एक रुपयाचा निधी न आणल्यामुळे या वेळेस आढळराव यांना निवडुन आणण्याचा निर्धार शिरुर लोकसभा मतदार संघातील मतदारांनी केला असल्याचे आढळराव या वेळी म्हणाले.

# अन्न पाण्याच्या शोधार्थ वन्यप्राणी मानवी वस्तीकडे




तांबडे मळा येथे अन्न पाण्याच्या शोधात माळरानावर फिरताना काळवीट

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने जंगल, वनात अन्न पाणी उपलब्ध होत असल्याने अनेक वन्य प्राणी मानवी वस्ती मध्ये येताना दिसत आहे. पुणे नाशिक महामार्गावरील तांबडे मळा येथे पाण्याच्या शोधात भटकंती करताना काळवीट भटकत होते, तर निरगुडसर येथे गेल्या काही दिवसापासून अन्न पाण्याचे शोधात काही वानरे गावात भटकत आहेत.

यंदाच्या वर्षी उन्हाळा कडक जाणवत आहे. त्यातच मागील वर्षी पावसाळ्यात कमी प्रमाणात पाऊस झाल्यामुळे जंगल वनातील पानवठे म्हणावे असे भरले नाहीत तसेच जंगलात असणारी हिरवे गवत, कंदमुळे, फळे फुले या अन्नाची कमतरता भासत असल्याने वन्य प्राणी अन्न पाण्याच्या शोधार्थ मानवी वस्तीकडे येत आहेत. आंबेगाव तालुक्यातील अवसरी खु.येथील तांबडे मळा येथे माळरानावर काळवीट अन्न पाण्यासाठी सैरावैरा पळत असताना तेथील ग्रामस्थांना दिसले. तांबड़े मळा येथे शेजारीच जुन्नर वन विभागाचे मोठे जंगल आहे. या जंगलातून काळवीट जातीचे हरीण अन्न पाण्यासाठी वणवण करीत बाहेर पडत असावे. तसेच निरगुडसर मेंगडेवाडी परिसरातही केलं काय दिवसापासून अन्न पाण्याच्या शोधात गावात दोन वानर फिरत आहेत. हि वानरे अनेकांच्या घरावर जाऊन बसतात त्याना गावातील लोकही अन्न पाणी देत आहेत. या अगोदरही उन्हाळयात हरणा बरोबरच कोल्हे, लांडगे, तरस, मोर, वानर, खवले मांजर, रानमांजर, असे विविध प्राणी मानवी वस्तीत आढळून आले आहेत. तांबडे मळा येथील ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार या गावाजवळूनच पुणे - नाशिक महामार्ग जात असून वन्य प्राण्यांचे महामार्गावर येऊन अपघात होण्याची शक्यता होत आहे, वनविभागाने वन्य जीव यांसाठी अन्न व पाणीयांची सोय करावी म्हणजे वन्य प्राणी यांची मानवी वस्तीतील भटकंती थांबेल व त्यांचे प्राण वाचतील.

द•ख•ल

## निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी



**आंबेगाव :** १९६ आंबेगाव, रुग्ण कल्याण कक्ष आरोग्य विभाग पंचायत समिती यांच्या मार्फत तहसील कार्यालय घोडेगाव येथे दि. २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९:३० ते दुपारी २ वाजेपर्यंत सर्व निवडणूक नियुक्त कर्मचारी यांचेसाठी मोफत प्राथमिक तपासणी जसे उच रक्तदाब, मधूमेह व थायरॉईड यासारख्या बऱ्याच तपासण्या करण्यात आल्या. सदर आरोग्य तपासणीचे उद्घाटन संजय नागटिळक , तहसीलदार आंबेगाव तथा अतिरिक्त सहायक निडणूक निर्णय अधिकारी १९६-आंबेगाव, यांच्या हस्ते करण्यात आले. सदर तपासणीस ए. बी. गवारी,नायब तहसील दार हे उपस्थित होते. निवडणूक आयोगाने नेमलेल्या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी याचा लाभ घेतला. सदर तपासनीचे काम खालील आरोग्य सेवकांनी पहिले , डॉ संदीप जाधव, डॉ नवनाथ भोर, दत्तात्रय श्रीगादी, शिवाजी सानप, गणेश वेलवटे, संदीप कदम कविता काळोखे, उर्मिला भास्कर, अक्षदा गायकवाड, अशोक निघोट व वैभव खिरड.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माळेगावात रुट मार्च



**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील माळेगाव पोलीस स्टेशन कार्यक्षेत्र अंतर्गत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक पार्श्वभूमीवर शुक्रवार दि २६ रोजी सकाळी माळेगाव बुद्रुक नगरपंचायत शहरात निरा- बारामती मार्ग सह विद्यानगर - राजवाडा - राजे अमरसिंह कॉलनी, मुख्य बाजार पेठ, नगरपंचायत वेस - राजहंस चौक या मार्ग तर मौजे मेडद ता.बारामती या गावात संपूर्ण गावठाण हद्दीत ग्रामपंचायत कार्यालय, जोशीवाडा, भीमनगर परिसर या ठिकाणी आगामी लोकसभा निवडणूक शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडावी या करीता माळेगाव पोलीस स्टेशन प्रभारी आधिकारी सहा.पोलीस निरीक्षक बालाजी भांगे, तसेच केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे (उखडऋ) उपनिरीक्षक एस.बी.यादव यांचे सह एकूण ४६ अंमलदार यांचा रूट मार्च काढण्यात आला.

# जातेगावात चोरी व महिलेचा खून करणारे दोघे जेरबंद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** जातेगाव बुद्रुक (ता.शिरुर) येथे २३ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी करुन चोरी करताना एका ज्येष्ठ महिलेवर प्राणघातक हल्ला केल्याने कृष्णाबाई ज्ञानेश्वर इंगवले ही महिला जागीच ठार झाली. या गुन्ह्यातील दोघांना जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले असून प्रवीण दिपक भोसले व सोनू उर्फ समीर निकम भोसले असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या आरोपींची नावे आहेत.




जातेगाव बुद्रुक (ता. शिरुर) येथील कृष्णाबाई इंगवले घरात झोपलेल्या असताना रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी घरात प्रवेश करुन कृष्णाबाई यांना मारहाण करत त्यांच्या गळ्यातील दोन तोळे वजनाचे दागिने व काही रक्कम चोरून नेली दरम्यान चोरट्यांनी केलेल्या मारहाणीमध्ये कृष्णाबाई ज्ञानेश्वर इंगवले (वय ७६ वर्षे रा. जातेगाव बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे) या महिलेचा जागीच मृत्यू झाला होता, याबाबत नंदा अमर इंगवले (वय ३६ वर्षे रा. जातेगाव बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर खुनासह चोरी प्रकरणी गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्याचा तपास करत असताना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागासह शिक्रापूर पोलिसांच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही सह आदी माहिती संकलित केली. या गुन्ह्यातील आरोपींची माहिती पोलिसांना मिळाली त्यांनतर पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला असता गुन्ह्यातील आरोपी बाहेरील जिल्ह्यात फरार झाल्याचे समजताच शिक्रापूर पोलिसांचे दोन पथक व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या दोन पथकांनी शिताफीने प्रवीण दिपक भोसले (वय २१ वर्षे) व सोनू उर्फ समीर निकम भोसले (वय १९ वर्षे दोघे रा. तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे) या दोघांना ताब्यात घेत चौकशी केली. त्यांनी त्यांच्या अजूनही दोघा साथीदारांच्या मदतीने चोरी केल्याची तसेच चोरी दरम्यान सदर महिलेने प्रतिकार करत आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केल्याने तिला मारले असल्याची कबुली दिली. दरम्यान पोलिसांनी दोघांना अटक केली असून त्यांच्या दोघा साथीदारांचा शोध घेण्यासाठी दोन पोलीस पथके रवाना करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# राज्यस्तरीय युथ आयडॉल पुरस्कारासाठी गुळूमकर यांची निवड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**बारामती :** बारामती तालुक्यातील युवा सामाजिक कार्यकर्ते प्रितम गुळूमकर यांना व्यंकटेश बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आळंदी पुणे या संस्थेमार्फत पुरस्कार देण्यात येणार आहे. राष्ट्रीय सेवा योजना, विद्यापीठ प्रतिनिधी,पोलीस मित्र संघटना अंतर्गत आणि इतर सामाजिक व शासकीय संस्थांच्या माध्यमातून त्यांनी विविध समाज उपयोगी व विधायक कार्यक्रम राबवले आहे. त्याची दखल घेत त्यांना पुरस्कार जाहीर केला आहे. ते गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात हिरहिरीने भाग घेऊन रक्तदान व वृक्षारोपण तसेच अनेक लोकोपयोगी कार्य केले आहे व करत आहेत. अतिशय कमी वयात त्यांनी समाजसेवेला सुरुवात केली आहे. या प्रसंगी त्यांना बारामती तालुक्यातील सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच मित्र परिवार आणि कुटुंबातील सर्व नातेवाईक आदींनी त्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# नेते मंडळी एकत्र मात्र कार्यकर्त्यांची मने जुळतील का ?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**दिवे :** लोकसभा निवडणूकीत संपूर्ण देशात बारामती लोकसभा मतदारसंघात चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. त्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष या मतदारसंघाकडे लागले आहे. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी ही लढत होणार आहे. त्यामुळे कधी नव्हे ते पक्ष आणि नेते मंडळीं एकत्र आले आहेत इतके दिवस ज्यांच्या विरोधात अगदी ग्रामपंचायत पासून अक्षरशः रान उठवले आज त्यांचाच प्रचार करण्याची वेळ काही मंडळींवर आली आहे.

कधी नव्हे त्यांच्याशी जुळवून घेतले गेले आहे. परंतु नेते मंडळीं एक झाले कार्यकर्ते एक होतील का? कार्यकर्त्यांची मने जुळतील का? ही डोकेदुखी नेते मंडळींपुढे आ वासून उभी आहे.

नेते मंडळीं एखाद्या कार्यक्रमानिमित्त लग्न समारंभात एकत्र येतात एकमेकांशी हस्तांदोलन करताना दिसतात गावपातळीवर मात्र याच नेत्यांसाठी कार्यकर्ते एकमेकांकडे बघत देखील नाहीत.काही मंडळी एका रात्रीत एक झाले आहेत. कार्यकर्ते मात्र अजूनही संभ्रमात आहेत. त्यामुळे प्रचारात म्हणावा तितका सहभाग ग्रामीण भागात तरी दिसत नाही हिच डोकेदुखी ग्रामीण भागात तरी नेतेमंडळींची ठरणार आहे. सोशल मीडियावर तशा वेगवेगळ्या प्रखर प्रतिक्रिया सध्या पाहायला मिळत आहेत. निवडणूकिला अजून काही अवधी आहे. तोपर्यंत कार्यकर्त्यांची मने जुळतील का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# वैद्यकीय क्षेत्राचे व्यापारी करण झाले : धर्माधिकारी

## डॉ. संगमनेरकर यांच्या झेप येशाकडे पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**पुणे :** डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील नजरेच्या माध्यमातून होणारा संवाद महत्त्वाचा आहे. डॉक्टर आणि रुग्णांमधील संवाद म्हणजेच माणूसपणाची घेतलेली दखल आहे. काही डॉक्टर असे असतात की, त्यांच्याकडे पाहिल्यावरच अर्धे आजार बरे होतात. परंतु डॉक्टरांना मारहाणीचे प्रसंग होताना दिसतात. वैद्यकीय क्षेत्राचे व्यापारीकरण झाले आहे. अनेकदा रुग्णांकडे माणूस म्हणून नाही तर रुग्ण म्हणूनच पाहिले जाते, असे मत माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

डॉ.राधा संगमनेरकर लिखित 'झेप यशाकडे' या पुस्तकाचे प्रकाशन अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ.रमेश भोसले, डॉ. अमोल अन्नदाते, लेखिका डॉ. राधा संगमनेरकर, डॉ.मुकुंद संगमनेरकर, डॉ.अभिजित अन्नदाते, डॉ. सई संगमनेरकर आदी उपस्थित होते.

अविनाश धर्माधिकारी म्हणाले, या पुस्तकाच्या माध्यमातून येणाऱ्या पिढीसमोर आदर्श ठेवण्यात आला आहे. पुस्तकातील अनेक घटना वाचल्यावर हे पुस्तक वेदनादायी परंतु आपले ज्ञान वाढवणारे आहे, असे लक्षात येते. विश्वाची माऊली काय काय सोसून विश्वाला वाढवत असते याची प्रचिती पुस्तकातून येते.

डॉ. राधा संगमनेरकर म्हणाल्या, ग्रामीण भागात मी काम करत होते प्रत्यक्ष अनुभवासाठी विविध हॉस्पिटलमध्ये काम केले आणि शेवटी आपल्या गावातील लोकांना सेवा मिळावी म्हणून गावी हॉस्पिटल उभारले.

पुस्तकी ज्ञानाला व्यवहारात ज्ञानाची जोड मिळेल आणि एक चांगला डॉक्टर होण्यासाठी या पुस्तकातून प्रेरणा मिळेल, असेही त्यांनी सांगितले. प्रारंभी गीता भुर्के यांनी गणेशवंदना सादर केली. डॉ.श्याम भुर्के यांनी सूत्रसंचालन केले. डॉ मुकुंद संगमनेरकर यांनी आभार मानले.

# रिंकू बनसोडे यांना न्याय मिळावा महावितरण कर्मचाऱ्यांची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती परिमंडळा अंतर्गत मोरगाव शाखा कार्यालयांतर्गत स्व. रिंकू बनसोडे, वरिष्ठ तंत्रज्ञ, (३४ वर्ष) यांच्यावर ग्राहकांनी केलेल्या प्राणघातक हल्लूयात त्यांचा दुर्दैवी अंत झाला त्या अनुषंगाने बारामती परिमंडळ ऊर्जा भवन, बारामती येथे संयुक्त कृती समितीच्या वतीने शोकसभा घेऊन जाहीर निषेध नोंदवून त्यांच्या मारेकऱ्यास कडक शिक्षा व्हावी व रिंकू बनसोडे यांना न्याय मिळावा अशी मागणी महावितरण कर्मचारी कृती समिती यांच्या वतीने करण्यात आली.


यावेळी कृती समितीच्या वतीने सुरेश देवकर, विलास चौधर, गणेश जाधव, कल्याण धुमाळ, कैलास महाडिक, श्रीधर कांबळे यांनी तीव्र स्वरूपात निषेध नोंदवून सदरचा खटला फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालवण्यात यावा व आरोपीस कठोरात कठोर शिक्षा बजावण्यात यावी, तसेच सर्व शाखा कार्यालया व उपकेंद्र करिता सुरक्षा रक्षकाची तातडीने नेमणूक करण्यात यावी, त्याचबरोबर महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कर्मचाऱ्यांना लोकसेवकाचा दर्जा मिळवून देण्यासाठी युद्ध पातळीवर मुख्य कार्यालयाच्या प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात यावेत अशी मागणी कृती समितीच्या वतीने करण्यात आली.

यावेळी प्रशासनाच्या वतीने मा.पावडे मुख्य अभियंता, बारामती परिमंडळ. यांनी द्वार सभेसाठी जमलेल्या सर्व संयुक्त कृती समितीच्या सदस्या समोर गेट मिटींगला सामोरे जाऊन त्यांनी त्यांच्या भावना जमलेल्या कर्मचाऱ्यांसमोर व्यक्त केल्या व कर्मचाऱ्यांना दिलासा दिला. झालेल्या घटनेची दखल घेऊन मुख्य कार्यालयाकडे व परिमंडळ स्तरावरून त्याच्यावर तातडीने कार्यवाही करण्यात येईल याबाबत अश्वस्त केले. यावेळी बारामती ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता पाटील, वायदंडे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सोनवलकर कार्यकारी अभियंता बारामती विभाग. हे द्वार सभेस उपस्थित होते.



रिंकू बनसोडे यांच्या हत्येचा निषेध करताना महावितरणचे कर्मचारी

द·ख·ल



## धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयास पुस्तकांची भेट

**नगर** : निमगाव वाघा (ता. नगर) येथील धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयास ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे यांनी जागतिक पुस्तक दिनानिमित्त पुस्तकांची भेट दिली. वाचनालयाचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांच्याकडे पुस्तके सुपुर्द करण्यात आली. यावेळी साहित्यिक शब्बीर शेख, अशोक खरमाळे उपस्थित होते.

चंद्रकांत पालवे म्हणाले की, माहिती अनुभव, ज्ञान व शहाणपण पुस्तकंच देतात. पुस्तकांनी माणुस घडतो, व्यक्ती म्हणून त्याचा विकास होतो. युवा वर्ग मोबाईलमध्ये गुरफटल्याने वाचन संस्कृती लोप पावत आहे. शहरी व ग्रामीण भागात वाचन संस्कृती जोपासण्याची गरज असून, त्या दृष्टीकोनाने धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाचे सुरु असलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. पै. नाना डोंगरे म्हणाले की, सुसंस्कारीत समाज निर्मितीसाठी वाचन आवश्यक आहे. वाचन हा एक संवाद आहे. पुस्तकाचे वाचन केल्यास शब्दांच्या उच्चाराला धार येऊन उत्तम वक्तृत्व कौशल्य निर्माण होते. तर शब्दसंग्रह व ज्ञानात भर पडते. पुस्तक हे एक मार्गदर्शक असून, अनेक महान व्यक्तीमत्व पुस्तक वाचनातून प्रेरणा घेऊन घडले आहेत. वाचन संस्कृती रुजविण्याबरोबरच संस्थेच्या माध्यमातून काव्य संमेलन घेऊन नवोदित कवींना प्रोत्साहन देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कवी चंद्रकांत पालवे लिखित पुस्तकांची भेट धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयास देण्यात आली आहे.

## चतुर्थीनिमित्त आव्हाणे येथे आज विविध कार्यक्रम



**ढोरजळगांव** : शेवगाव तालुक्यातील श्री गणपती मंदिर ट्रस्ट आव्हणे बु येथे शनिवार दि २७ एप्रिल रोजी संकष्टी चतुर्थी निमित्ताने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ वा. पैठणवरून आणलेल्या गंगेच्या पाण्याने श्रीची आरती व महाभिषेक आदिनाथ झांजे यांच्या हस्ते होणार असुन. दुपारी १२ वा. भाविकांना फराळाची व्यवस्था झांजे दात्याच्या वतीने करण्यात आली आहे.सायंकाळी ६ वा. हभप आदिनाथ महाराज खोसे (आळंदी) यांचे कीर्तन होईल. सायं. ७ वा. श्रीची आरती व महाभिषेक डॉ संदीप आहेर यांच्या हस्ते होईल. रात्री ९ वा आहेर दात्याच्यावतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.त्यानंतर रात्री १० वा दादोबा देव एकतारी भजनी मंडळ आव्हाणे बु पंचक्रोशीतील भजनीमंडळाचा जागराचा कार्यक्रम होईल, तरी या धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री गणपती मंदिर आव्हाणे बु ट्रस्टचे सचिव लक्ष्मण मुटकुळे यांनी केले आहे.

## हनुमान चालीसा व भजनसंध्याची सांगता

**नगर** : मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने आयोजित सामुहिक हनुमान चालिसा पाठ व भजन संध्या चे ४१ वे पुष्प मंगल भक्त सेवा मंडळ श्री दत्त क्षेत्र मंदिर,एफ ७०, एमआयडीसी,अहमदनगर येथे संपन्न झाले व गेले ४१ दिवस सलग शहरांमध्ये विविध ठिकाणी हनुमान चालीसा पठण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते त्याची आज सांगता करण्यात आली. सांगते प्रसंगी दत्त क्षेत्र परिसर सजविण्यात आला होता व आकर्षक असे व्यासपीठ व लाइटिंग करण्यात आली होती. हनुमान चालीसाच्या कार्यक्रमात मंगल भक्त सेवा मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ कोठारी यांच्या उपस्तिथीत पवन फिरोदिया,संजय आंधळे,नितीन निबाळकर,प्रकाश भळगट,सुमित वर्मा,संतोष होनवाल,अन्नमय गुप्ता यांनी गाण्यातून भाविक भक्तानी मंत्रमुग्ध केले.

### वाढते तापमान व ग्लोबल वॉर्मिंगच्या प्रश्नावर

# राष्ट्रीय हरित धनराई जलसंधारण क्रांतीचा आग्रह

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर** : वाढते तापमान, भूगर्भातील कमी होत चाललेली पाणी पातळी रोखण्यासाठी व ग्लोबल वॉर्मिंग सारख्या प्रश्नाला तोंड देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय लोकभज्ञाक चळवळीने राष्ट्रीय हरित धनराई जलसंधारण क्रांतीचा आग्रह धरला असल्याची माहिती चळवळीचे समन्वयक ड. कारभारी गवळी यांनी दिली आहे.

सन १९६८ नंतर महाराष्ट्रासह देशभरात ऑइल इंजनमुळे मोठ्या प्रमाणात भूगर्भातील पाणीसाठ्यांचा उपसा सुरू झाला. पुढे विजेच्या मोटारीच्या मदतीने पाणी पंप चालविण्यात आले. लाखो शेतकऱ्यांनी पुढे जाऊन बोअरवेल खोदल्या आणि भूगर्भातील पाण्याची पातळी ३०० ते ४०० फूट खाली गेली. झाडांच्या मुलांना पाणी न मिळाल्यामुळे सगळीकडे वाळवंट निर्मिती सुरू झाली. दख्खनच्या पठारावर मोठ्या प्रमाणावर झाड तोड झाली



आणि यंदाच्या उन्हाळ्यात तापमान ४५ डिग्रीच्या वर गेले. याला संपूर्ण समाज जबाबदार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

वृक्ष पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी भूगर्भात साठवतात, त्यामुळे पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढते. शेत जमिनीमध्ये शेतकरी फळफळावळ न देणाऱ्या झाडांची लागवड करत नाही. परंतु आंबा, चिंच, फणस, चिक्कू, पेरू अशा फळाचे उत्पादन देणाऱ्या झाडांची लागवड नक्की करतात. त्यामुळे नैसर्गिक जलसंधारण होते व शेतकऱ्यांना दरवर्षी आर्थिक फायदा देखील मोठा होतो. ग्लोबल वॉर्मिंग विरोधात राष्ट्रीय हरित धनराई जलसंधारण क्रांतीशिवाय पर्याय नाही. एकाच वेळेला आर्थिक फायदा करून देणाऱ्या फळझाडांची लागवड करणे आणि त्याच वेळेला आपल्या परिसरामध्ये भूगर्भपातळी वाढवणे या कामाला फार मोठे महत्त्व आहे. त्यामुळे लोकभज्ञाक चळवळीने शेतकऱ्यांमध्ये याबाबत जागृती निर्माण करण्याची मोहीम सुरू केली आहे. केंद्र सरकारने देशभरातील शेतकऱ्यांना या संदर्भात आर्थिक अनुदान देण्याची आवश्यकता असल्याचे ड. गवळी यांनी म्हंटले आहे.

आजपर्यंत शेतकऱ्यांनी बांधावरील झाडे तोडून टाकली. बांधावरुन मारामाऱ्या सुरू केल्या, भूगर्भातील पाणी बोरच्या मदतीने मिळवण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. मोठ्या प्रमाणात शेततळे भरण्याचा प्रयत्न सुरू झाला, परंतु एकंदरीत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे वागणे हे निसर्गतंत्राशी विसंगत असल्यामुळे वाळवंट वाढत आहे आणि आपण सर्व तापमान वाढीला मदत करत आहोत. त्यामुळे लोकभज्ञाक चळवळीला सकारात्मक सहकार्य होणे गरजेचे आहे. एकाच वेळेला शेतकऱ्यांना आर्थिक फायदा त्याच वेळेला पर्यावरणाचे प्रश्न सोडवण्याचा नैसर्गिक मार्ग आणि आपले शिवार वाळवंट होण्यापासून वाचविण्याचा खात्रीचा मार्ग म्हणजे राष्ट्रीय हरित धनराई जलसंधारण योजना असून, याचा स्विकार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या मोहिमेसाठी ड. गवळी, अशोक सब्बन, ओम कदम, प्रकाश थोरात, जालिंदर बोरुडे, शाहीर कान्हू सुंबे, विठ्ठल सुरम आदी प्रयत्नशील आहेत.

# वीज पडून मायलेकरांचा मृत्यू झालेल्या कुटुंबियांचे पालकमंत्र्यांकडून सांत्वन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील येवती येथे सोमवार दि.२२ रोजी गावामध्ये शेतकरी कुटुंबातील कु.नवनाथ बाजीराव आढाव वय २६ वर्षे व मीनाबाई बाजीराव आढाव वय ५० वर्षे हे दोघं आई व मुलगा पावसाचे वातावरण झाले म्हणून शेतामध्ये कांदे झाकण्यासाठी गेले असता पाऊस आल्यामुळे लिंबाच्या झाडाच्या आडोशाला थांबले असतात त्यांच्या अंगावर वीज पडून त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला होता. ही बातमी वाऱ्यासारखी संपूर्ण जिल्ह्यामध्ये पसरली तसेच या घटनेची दखल घेऊन महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री व अहमदनगर जिल्हा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दि.२३ एप्रिल रोजी नैसर्गिक दुर्घटनेबाबत आढाव कुटुंबाची घरी जाऊन सांत्वन भेट घेतली व घटनेची माहिती घेऊन कुटुंबाला शासनाच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत कशी भेटेल याच्यासाठी प्रशासनाला आदेश देण्यात आले यावेळी मा.सरपंच नागेश मस्के,सरपंच विश्वास गुंजाळ,रवींद्र शिंदे,उमेश घेगडे,अनिल बनकर,बाळासाहेब महाडिक,ज्ञानेश्वर विखे पाटील,कोंडीबा ढवळे,अप्पासाहेब सातव,गणेश शिंदे,श्रीकांत जाधव,राहुल आढाव,पप्पू मस्के,जालिंदर चोरमले,ताराचंद रोटकर तसेच इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

**घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी व मनाला वेदना देणारी आहे.निसर्गाच्या पुढे कोणाचे काही चालत नाही परंतु या कुटुंबाला शासनाच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी तसेच अपघात विमा मध्ये या कुटुंबाला जास्तीत जास्त मदत भेटेल यासाठी प्रयत्न करणार असून श्रीगोंदा तहसीलदार व कलेक्टर यांना ताबडतोब अहवाल सादर करण्यासाठी आदेश दिले आहेत.**

**– राधाकृष्ण विखे पाटील**
**( महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अहमदनगर )**



**ढोरजळगांव : पर्यावरण संवर्धन अभियानातंर्गत त्रिमुर्ती कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय परिसरात विद्यार्थी व शिक्षक सेवकांनी बर्ड फिडर स्थापित करण्यात आले यावेळी उपस्थित प्राचार्य किशोर धनवटे,प्रा रजणिकांत पावसे,प्रा कृष्णा पाडळे आदी. (छाया: दिपक खोसे, ढोरजळगांव)**

# देवांग कोष्टी समाज मंडळाच्यावतीने भिंगार येथे गुणवंतांचा सत्कार



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : भिंगार येथील सरपण गल्लीतील देवांग कोष्टी समाज मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य कारागृह विभाग येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे तुरुंग अधिकारी श्रेणी दोन जगदीश अर्जुन ढुमणे , दहशतवाद पथक नाशिक सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश सुभाष खेडकर, सनदी लेखापाल परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अक्षरा ऋषिकेश पोंदे ( भिंगारकर ), सनदी लेखापाल परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल शुभदा बाळासाहेब बडदे, सनदी लेखापाल परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अश्विनी सुनिल कुलट, राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून एम पी एस सी परिक्षेत उत्तीर्ण होऊन पी एस आय झाल्याबद्दल पूजा सुनिता रमेश वराडे तसेच ज्युनिअर इंटेलिजन्स ऑफिसर केंद्रीय गुप्तवार्ता विभाग मुंबई हल्ली नेमणूक अहमदनगर गणेश ऊर्फ सुनिल प्रभाकर लकारे आदी मान्यवर गुणवंतांचा सत्कार अहमदनगर येथील देवांग कोष्टी समाजाचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय पोंदे, देवांग कोष्टी समाजाचे भिंगार येथील अध्यक्ष किशोर भिंगारकर, उपाध्यक्ष अशोक लकारे, सचिव प्रकाश तरवडे, खजिनदार रमेश वराडे, सुनिल वराडे,दिपक बडदे, महेश तरवडे, श्रीमती संध्या फळे, जयश्री सुनिल वराडे आदी तसेच अहमदनगर देवांग कोष्टी समाजाचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच भिंगार येथील व देवांग कोष्टी समाज मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य व समाजबांधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी गुणवंत मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की राज्य तसेच केंद्र सरकारच्या विविध पदावर काम करताना आपल्याकडून सर्वसामान्य जनतेची कामे कार्यक्षमपणे झाली पाहिजे हा खरा सेवाभाव आहे. अहिल्यानगर हा जिल्हा गुणवंतांची भुमी आहे या जिल्ह्यातून आपण सरकारच्या विविध पदावर कार्यरत असताना समाजाभिमुख जनता हा उद्देश ठेउन काम केले पाहिजे हीच आपली मानसिकता असून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही त्यांनी दिली . अहमदनगर देवांग कोष्टी समाज मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय पोंदे यांनी यावेळी सांगितले की भिंगार देवांग कोष्टी समाज मंडळाचे अध्यक्ष किशोर भिंगारकर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी सामाजिक भावनेतून काम करताना सेवाभाव केला आहे. समाजातील गुणवंत मान्यवरांचा सत्कार ही एक कौतुकास्पद बाब असून गुणवंताना प्रेरणादायी स्फूर्ती देण्याचे काम होत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी व्यक्त केले आहे. देवांग कोष्टी समाज मंडळाचे भिंगार येथील अध्यक्ष किशोर भिंगारकर यांनी सांगितले की समाज सेवा मंडळ माध्यमातून अनेक उपक्रम राबवून समाजाला प्रोत्साहन देण्याचे काम होत असून समाज संघ़टीत झाला पाहिजे यातून समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक झाली पाहिजे आणी गुणवंत मान्यवरांचा सत्कार ही बाब प्रत्तेकाला प्रोत्साहीत करणारी असल्याने हे सत्कार सोहळे समाजाच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन भिंगारकर यांनी व्यक्त केले आहे .

# लता दीदी म्हणजेच संगीत : अमिताभ बच्चन

**नगर** : लतादीदी म्हणजेच संगीत आणि संगीत म्हणजेच लता दीदी. लता दिदी संगीत क्षेत्रातील साक्षात सरस्वती देवी होत्या. अशा शब्दात प्रसिद्ध अभिनेते आणि अभिनय क्षेत्रातील शहेनशहा बिग बी अमिताभ बच्चन यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांना यंदाचा स्वर्गीय लता दीनानाथ मंगेशकर स्मृती जीवनगौरव पुरस्कार प्रसिद्ध गायिका उषा मंगेशकर यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.




मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान, हृदयेश आर्ट्स व म्युझिक मुड्सच्या संयुक्त विद्यमाने विलेपार्ले येथील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात रविवार दि. २४ एप्रिल एप्रिल रोजी सायंकाळी ६ वा. पार पडलेल्या ८२ व्या मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती सोहळ्यास पंडित हृदयनाथ मंगेशकर, गायिका उषा मंगेशकर, अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, पद्मिनी कोल्हापुरे, संगीतकार ए. आर. रहमान, प्रसिद्ध गायक रूपकुमार राठोड, अभिनेता रणदीप हुडा, अशोक सराफ, चिन्मय मांडलेकर, अतुल परचुरे, ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर, सामाजिक कार्यकर्ते यजुर्वेंद्र महाजन, मंजिरी फडके आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

लता मंगेशकर म्हणजे मधाची धार कारण मधाची धार ही सतत प्रवाही असते. ती कधीही तुटत नाही. त्याचप्रमाणे लता मंगेशकर यांचा सुरही कधी तुटत नाही. असे सांगताना लता मंगेशकर यांच्यावर रचलेली आकाशाची सावली ही कविता देखील त्यांनी सादर केली. आपल्या या कवितेत ते म्हणतात, रणरणत्या उन्हात आकाशाची सावली मला लाभली. त्या आकाशाचे नाव लता मंगेशकर. माझ्या कवितेत लतादीदींचे स्वर संगीताचा परिचय होता. हीच संगीताची परिभाषा आणि संगीताची व्याख्या होती. लतादीदी म्हणजेच संगीत आणि संगीत म्हणजेच लतादीदी. माझ्या कवितेला समानार्थी शब्द आहेत. दोन्ही गोष्टी या शब्दांमध्ये ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांनी आपल्या भावना व्यक्त करताच नाट्यगृहामध्ये टाळ्यांची प्रचंड बरसात झाली.

# जनावरांसाठी आज मोफत तपासणी शिबिर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर** : जागतिक पशुचिकित्सा दिवसानिमित्त जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय व जायंट्स ग्रुप ऑफ अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२७ एप्रिल) जनावरांची मोफत तपासणी उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जुने बस स्थानक जवळील जिल्हा पशु सर्व चिकित्सालय हॉस्पिटलमध्ये होणाऱ्या या शिबिराचा पशु पालकांना लाभ घेण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. मुकुंद राजळे यांनी केले आहे.

शनिवारी सकाळी १० वाजता शिबिराचे उद्घाटन होणार आहे. या शिबिरामध्ये मोफत श्वानदंश रोग प्रतिबंधक (रेबीज) लसीकरण, धनुर्वात प्रतिबंधक लसीकरण तसेच जंत प्रतिबंधक औषधे देण्यात येणार असल्याची माहिती जायंटस् वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी दिली.



हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. शशिकांत कारखेले, डॉ. वर्षा साबळे, डॉ. ज्ञानेश्वर काळे, जायंटस् ग्रुप ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षा पूजा पातुरकर, विद्या तन्वर नूतन गुगळे आदी प्रयत्नशील आहेत. शिबिरासाठी अजय मेडिकल शारदा एजन्सी व कडूस डिस्ट्रीब्यूटर्सने सहकार्य केले आहे.

# १५ मार्चचा अशैक्षणिक शासन निर्णय रद्द करावा

### शासन निर्णय सर्व सामान्यांच्या शिक्षणाचा अधिकार हिरावून घेणारा : बाबासाहेब बोडखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर** : संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करणे प्रकरणी निर्गमित केलेला १५ मार्च रोजीचा अशैक्षणिक शासन निर्णय रद्द घोषित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. तर सदर शासन निर्णय सर्व सामान्यांच्या शिक्षणाचा अधिकार हिरावून घेणारा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मागणीचे निवेदन माजी शिक्षक आमदार तथा शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालकांना दिला असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

१५ मार्च रोजीच्या संच मान्यतेच्या सुधारित निर्णयाद्वारे शासन अनुदानित, अंशतः अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय शाळेतील शैक्षणिक प्रशासकीय यंत्रणा उध्वस्त करून सदर शाळा बंद करण्याचे षडयंत्र रचत असल्याचे सुस्पष्ट होते. ही अत्यंत खेदाची व निंदनीय बाब आहे. राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळातील बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाचे (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित इत्यादी सर्व) नवीन शाळा सुरू करणे, वर्ग जोडणे त्या अनुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन निर्णय २८ ऑगस्ट २०१५ निर्गमित केला. या शासन निर्णयामध्ये ८ जानेवारी २०१६, २ जून २०१६ आणि १ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयानुसार आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या. सदर सर्व शासन निर्णय आणि यापूर्वी अस्तित्वात असलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमित करून शासन निर्णय १५ मार्च २०२४ निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णय बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदींच्या अस्तित्व नाकारणारा असून अशैक्षणिक आधारावर घेण्यात आलेला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार विद्यार्थी, शिक्षक प्रमाण प्रत्येक इयत्ता निहाय असताना तसेच अध्यापनाची प्रक्रिया प्रत्येक इयत्ता निहाय असताना सदर शासन निर्णयात विद्यार्थी शिक्षक प्रमाण भिन्न इयत्ता मधील विद्यार्थ्यांच्या गटानुसार निश्चित करण्यात आले आहे. ही बाब आरटीईएच्या निकषाशी विसंगत व अशैक्षणिक स्वरूपाची आहे. आरटीईनुसार प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणे शासनाची घटनात्मक जबाबदारी व कर्तव्य आहे. त्यामुळे विविध भिन्न इयत्ता मधील विद्यार्थी संख्येचा गट शिक्षक पदाच्या निश्चिती करिता आधार बनू शकत नाही.

महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मधील अनुसूची अनुसार शाळेचे शैक्षणिक व प्रशासकीय व्यवस्थेला शाळा समिती जबाबदार असून, मुख्याध्यापक शाळा समितीचा पदसिद्ध सचिव असतो. शाळा मान्यता, माध्यमिक शाळा संहिता आणि बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार देण्यात येते. त्यामुळे प्रत्येक शाळेला शैक्षणिक व प्रशासकीय यंत्रणा सांभाळण्यासाठी मुख्याध्यापकांचे पद मंजूर करणे अत्यावश्यक निकडीचे व बंधनकारक आहे. विद्यार्थी संख्येच्या निकषावर मुख्याध्यापकाचे पद देय ठरवणे अयोग्य अनुचित व बिनडोकपणाचे असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

इयत्ता निहाय अनिवार्य ऐच्छिक विषय आवश्यक तासिकेसह शासनद्वारे निश्चित केले जाते. तसेच नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक २१ नुसार शिक्षकांना प्रत्यक्ष शिकवण्याचा कार्यभार देणे बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुणवत्तेसाठी शाळेच्या गरजेनुसार शिक्षक व विशेष शिक्षकांची पदे निश्चित करणे अत्यावश्यक आहे. व्यावसायिक दृष्टिकोनातून नफा-तोट्याचा विचार करून शिक्षकांची पदे निश्चित करणे विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त करणारे आहे. एकंदरीत संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करणारा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय अस्तित्वात असलेल्या खाजगी अनुदानित, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा संपुष्टात आणून सर्व सामान्यांच्या शिक्षणाचा अधिकार हिरावून घेणारे असल्याचे निवेदनात म्हंटले आहे. त्यामुळे सदर शासन निर्णय तात्काळ रद्द घोषित करुन, इयत्ता निहाय विषय, कार्यभाराचे आधारे शिक्षक व विशेष शिक्षकांची पदे मुख्याध्यापकांच्या पदासह निश्चित करणारा शासन निर्णय घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे.



# राष्ट्र सह्याद्री



शनिवार, दि.२७ एप्रिल २०२४ | अहमदनगर | पान नं. ८


# लोकसभेचे राजकीय बोल

## विखेंना मिळाले श्रध्येय भगवानगडाचे आशीर्वाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**खरवंडी** : अहिल्यानगर दक्षिण लोकसभेचे उमेदवार डा॑. सुजय विखे यांनी जिल्हयातील श्ध्देय गडाच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. येथे येऊन काम करण्यासाठी मोठी उर्जा मिळते. येथील प्रेरणा घेऊन समाजासाठी काम करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे त्यांनी सांगितले.

देशात सुरू असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हमी, ही सर्वसामान्य नागरिकांच्या हितासासाठी आणि देशासाठी आवश्यक असून येणाऱ्या काळात देशाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खंबीर नेतृत्व असून देश त्यांच्या हाती सुरक्षित असल्याने लोकांनी पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराला मतदान करा, असे आवाहन ते नागरिकांना करत आहेत.डॉ. सुजय विखे यांनी भगवान गड परिसरातील गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांच्या सोबत आमदार मोनिका राजळे आणि इतर कार्यकर्ते होते.



यावेळी डॉ. विखे यांनी भगवान बाबांच्या समाधीला अभिवादन करत महंत शास्त्री महाराज यांचे आशिर्वाद घेतले. तसेच गड परिसरातील ग्रामस्थांशी संवाद साधला. ग्रामस्थांनीदेखील त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा शब्द यावेळी दिला. खरवंडी, दैत्य नांदूर, टाकळी, पाथर्डी तालुक्यातील अनेक गावातील ग्रामस्थांनी सुजय विखे यांचे वाजतगाजत स्वागत केले.

यावेळी संवाद साधताना ते म्हणाले की प्रथा, परंपरेप्रमाणे मी गडावर आलो आहे, शास्त्री महाराजांनी मला आशीर्वाद दिला आहे. भगवानगडाच्या परिसराच्या विकासासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून आम्ही नेहमीच कटीबद्ध राहू. भगवानगड हे महाराष्ट्रातील प्रमुख अध्यात्मिक केंद्र असून त्याचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्याचा मानस व्यक्त करत त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करणार असे त्यांनी सांगितले. तसेच संत ज्ञानेश्वरांच्या मंदिराचे काम पूर्ण केले जाईल. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांच्या रोजगारासाठी पाऊले उचलणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार मोनिका राजळे म्हणाल्या की, मागील पाच वर्षात डॉ. सुजय विखे यांनी जिल्ह्याचे विविध प्रश्न प्रभावीपणे संसदेत मांडून जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात निधी मिळवून विविध विकासकामे केली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांना साथ मिळाल्याने येणाऱ्या काळात डॉ. विखे जिल्ह्याचा विकास अधिक जलद गतीने करतील. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात आणल्या जातील. मनसेचे नेते देविदास खेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी डॉ. सुजय विखे यांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी पाथर्डी-शेवगावमत दारसंघातील अनेक गावातील सरपंच, उपसरपंच, आजी-माजी सदस्य उपस्थित होते

## पारनेरमधील जनता निलेश लंकेंवर नाराज : राहुल शिंदे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

अहिल्यानगर : महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी आमदार असताना तालुक्याच्या कुठल्याही प्रश्नांची सोडवणूक केली नाही. केवळ दहशतीला खतपाणी घालण्याचे काम त्यांनी आपल्या बगल बच्च्यांमार्फत केले.यामुळे मतदारसंघातील जनता त्यांना कोणताही थारा देणार नाही, असा घणाघात पारनेरचे भाजप तालुका अध्यक्ष राहुल शिंदे यांनी केला. त्यात त्यांनी केवळ उमेदवारीसाठी अजित पवारांशी केलेल्या गद्दारीमुळे निष्ठावंत कार्यकर्ते नाराज आहेत, असेही शिंदे म्हणाले.

शिंदे म्हणाले की, पारनेरचे आमदार निलेश लंके यांनी कोवीड काळात केलेल्या नौटंकीचा पर्दाफाश आता झाला आहे. सरकारचे अनुदान घेऊन कोवीड सेंटरच्या माध्यमातून श्रेय लाटण्याचे काम त्यांनी केले. एकीकडे जनता कोवीड संकटाने त्रस्त झाली असताना लंके मात्र या संकटातून प्रसिद्धी मिळविण्यात दंग होते. ही बाब मतदारसंघातील जनतेला रुचलेली नाही. लंके यांनी केवळ लोकसभेच्या उमेदवारीसाठी अजितदादांची साथ सोडली. सहा महिन्यात त्यांनी अजित पवारांशी गद्दारी केली. यामुळे मतदारसंघातील लोकांचा विश्वास ते कसा संपादन करतील, असा सवाल शिंदे उपस्थित केला. महायुतीचे उमेदवार यांनी कोवीड काळात आपल्या रुग्णालयात लोकांची मोफत सेवा केली. त्याचबरोबर जिल्हाभर आरोग्य शिबिरे घेऊन लोकांना सहकार्य केले. पण याची कुठेही प्रसिद्धी केली नाही. कोणता पुरस्कार मिळावा यासाठी आटापिटा केला नाही. या सर्व सेवाभावी कार्याची सहानभूती डॉ. सुजय विखे यांना निश्चित मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## शेवगावात डॉ. सुजय विखेंनी साधला मतदारांशी संवाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : दक्षिण मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार डॉ. सुजय विखे शुक्रवारी शहरात आपल्या प्रचार सभा घेतल्या. शेवगावातही त्यांचा डंका दिसून आला. यावेळी त्यांच्या सोबत आमदार मोनिका राजळे, अरुण मुंडे यांच्यासह इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. विखे नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या. फर्टीलायझर असोसिएशनची बैठक घेतली. यावेळी त्यांनी फर्टीलायझर व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांशी संवाद साधत विविध प्रश्नांवर चर्चा केली. येणाऱ्या काळात महायुती सरकारच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न सोडविले जातील असे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर शेवगांव न्यायालय परिसर येथे वकील संघटनेशी बैठक घेत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या समस्या लवकरच मार्गी लावल्या जातील असे आश्वासन दिले.



सायंकाळी विखे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते क्रांती चौक, - छत्रपती शिवाजी महाराज चौक, भगत सिंग चौक येथे पदयात्रा काढून मतदारांशी संवाद साधला व देशाच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीला मतदान करा असे आवाहन केले. ठिकठिकाणी त्यांचे स्वागत आणि औक्षण करण्यात आले. पदयात्रेत कार्यकर्ते, महिला, वृद्धांनी सहभाग घेतला होता. सोनमिया वस्ती येथे भोई समाज, बावडी गल्ली येथे चर्मकार समाज, तर जैन स्थानक येथे जैन समाजांच्या प्रतिनिधींच्या बैठका घेतल्या. यावेळी या समाजातील नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तर बालाजी मंदिर, मारवाडी गल्ली येथे व्यापारी आणि माहेश्वरी समाजीतील नागरिकांशी संवाद साधत त्यांनी आपल्या प्रचाराचा समारोप केला.

## पाणी पेटवून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न यशस्वी होणार नाही : पाचपुते

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : कोणत्याही निवडणुका जाहीर झाल्या किंवा निवडणुका जवळ आल्या की श्रीगोंद्यात राजकीय नेते चक्क पाणीसुद्धा पेटवून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करतात. पण कमनशिबी नेत्यांना ते शक्य होत नाही असा टोला विक्रम पाचपुते यांनी नमो सवांद यात्रेत लगावला आहे

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विक्रम पाचपुते यांनी खासदार सुजय विखे यांच्या प्रचारार्थ नमो सवांद यात्रेचे आयोजन केले आहे. ही यात्रा तालुक्यातील टाकळी कडे या ठिकाणी आल्यावर कॉर्नर सभेचे आयोज़न करण्यात आले होते. त्यावेळी पाचपुते यांनी जनतेशी संवाद साधताना सांगितले की तालुक्यात निवडणुका जाहीर झाल्यावर नाहीतर निवडणुका जवळ आल्यावर तालुक्यातील राजकारणी पाणी पेटवतात आणि आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करतात. मात्र ते कमनशिबी असल्यामुळे त्याची पोळी भाजली जात नाही. अडचणींवर मात करण्यासाठी पाचपुते यांच्या कार्यकर्त्याचा वापर केला जातोय. कार्यकर्त्यांनी समोरच्या व्यक्तीच्या अडचणी संपल्यावर तो आपल्याला अडचणीत आणणार नाही याची खात्री करा. आम्हाला राजकरण



शिकविण्याची गरज नाही आम्ही ते कर्णासारखे गर्भातूनच शिकून आलोय असे सांगून ते म्हणाले की, कांदा, दूध याचे बाजारभाव कायम बदलत राहतात त्याची वर्षभराच्या बाजारभावाची माहिती जनतेला दिली पाहिजे. पाहिजे टाकळी कडे गाव आता महामार्गाशी जोडले जाणार असून दळणवळणाच्या सोईनुसार आर्थिक उलाढाली वाढणार आहेत. त्यामुळे आपल्याला एकजुटीने काम करायचे आहे असेही त्यांनी सांगितले.

सध्या लोकसभा निवडणुकीच्या बाबतीत सोशल मीडियाच्या माध्यमातून विशिष्ठ पक्षाची आणि नेत्याची मोठ्या प्रमाणात हवा आहे आणि आपला उमेदवार लाखोंच्या मतांनी विजयी होणार असा दावा केला जात आहे. पण ही सगळी भुलभुलैया आहे. जनता यास बळी पडणार नाही असेही पाचपुते यांनी बोलताना सांगितले.

## विहिरीत मृतदेह आढळला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**वैजापूर** : वैजापूर तालुक्यातील शिऊर पोलिस ठाण्याच्या हद्दीत कोल्ही शिवारात धरणातील विहिरीत एका व्यक्तीचा मृतदेह शुक्रवारी आढळुन आला. या व्यक्तीची ओळख पटली असुन हिरामण कारभारी पगारे (वय ४६) राहणार अलापूरवाडी असे त्यांचे नाव आहे. हिरामण गुरुवारी जनावरांना पाणी पाजण्यासाठी कोल्ही येथील धरण क्षेत्रात गेले होते. मात्र ते घरी परतले नाहीत. शुक्रवारी धरण क्षेत्रातील एका विहिरीत त्यांचा मृतदेह आढळला.पाय घसरुन पडल्याने विहिरीतील पाण्यात बुडवून त्यांचा मृत्यु झाला असावा असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान या प्रकरणी शिऊर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली असुन अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## शेतीची राखण करणारा मी तुमचा म्हसोबाच : राजू शेट्टी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शिरटे** : ग्रामीण भागात शेतीची राखण करणारा म्हसोबा प्रत्येक गावात असतोच. त्याप्रमाणेच मीदेखील तुमच्या उसाची राखण करणारा म्हसोबाच आहे. पाच वर्षांतून फक्त एकदाच मला नैवेद्य दाखवा, म्हणजे मी तुमच्या उसाची राखण करतो, अशी साद हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील स्वाभिमानी पक्षाचे उमेदवार व माजी खासदार राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांना घातली.

क्रांतिसिंह नाना पाटील यांची जन्मभूमी असलेल्या येडेमच्छिंद्र (ता. वाळवा) येथून लोकसभा निवडणुकीचा प्रचाराला शेट्टी यांनी सुरवात केली. त्यावेळी आयोजित सभेत ते बोलत होते. माजी उपसरपंच संदीप दबडे उपस्थित होते. शेट्टी म्हणाले, पक्ष बदलणारे लोक आणि साखर कारखानदार एकत्र येऊन मतदार आणि कार्यकर्त्यांवर प्रचंड दबाव आणत आहेत. कार्यकर्त्यांवर खोटे आरोप करून खोट्या केसेस दाखल करीत आहेत. परंतु सामान्य कार्यकर्त्याला विनाकारण त्रास दिल्यास गाठ माझ्याशी आहे हे त्यांनी विसरू नये, असा इशारा त्यांनी दिला.

## 'एमआयएम'मुळे महाविकास आघाडीच्या अडचणी वाढल्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : अहिल्या नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या रणांगणात गरुवारी नवा बिडू दाखल झाला आहे. एमआयएमतर्फे डॉ. परवेश अशरफी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले डॉ. अशरफी निवडणुकीच्या मैदानात आल्याने अल्पसंख्यांक मतांवर डोळा ठेऊन असलेल्या महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. डॉ. अशरफीच्या रुपाने महाविकास आघाडीच्या अडचणी वाढल्या असल्याची चर्चा सध्या रंगली आहे.

दक्षिण नगर लोकसभा मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांमुळे निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असताना त्यात आता एमआयएमने उडी घेतल्याने या निवडणुकीला चांगलीच रंगत येणार आहे. महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी आधीच महविकास आघाडीवर कुरघोडी करत प्रचारात चांगलीच आघाडी घेतली आहे. तर महाविकास आघाडीला उमेदवार सापडत नसल्याने आयता उमेदवार घेऊन निलेश लंके यांना मैदानात उतरविले. पण तोवर वेळ निघून गेली होती. कारण डॉ. सुजय विखे यांनी तोवर मतदारांच्या गाठीभेटी वाढवत आपले वातावरण तयार केले आहे. यामुळे महाविकास आघाडीने मतदार संघातील अल्पसंख्याक समाजावर आपले लक्ष केंद्रीत करत त्यांना आपल्या गळाला लावण्याचा जोरदार प्रयत्न चालवला आहे. पण आता खुद्द एमआयएमने आपला गडी रिंगणात उतरवल्याने महाविकास आघाडीच्या गोटात चिंतेची लाट पसरली आहे.

एमआयएम ने दिलेले उमेदवार डॉ. परवेश अशरफी हे सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. महाविकास आघाडीने केवळ अल्पसंख्यांक मतांचा आपल्या राजकीय फायद्यासाठी वापर केला असून, राज्यात एकही अल्पसंख्याक उमेदवार दिला नाही. यामुळे अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण ही निवडणूक लढवत असल्याचे डॉ. अशरफी यांनी सांगितले. त्यांना जनता आता किती साथ देणार हे तर ४ जूनला समोर येईल. पण दक्षिण लोकसभा मतदार संघात एमआयएम दाखल झाल्याने तिरंगी लढत पहायला मिळणार आहे.

## ५० हजारांसाठी विवाहितेचा छळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शेत जमीन घेण्यासाठी माहेरहून ५० हजार रुपये आणावेत, या मागणीसाठी सासरच्या लोकांनी विवाहित तरुणीचा शारीरिक व मानसिक छळ केला. या घटने बाबत राहुरी पोलीस ठाण्यात सासरच्या पाच लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

मयुरी अनिल देठे, वय २८ वर्षे, रा. लाख रोड, देवळाली प्रवरा, ता. राहुरी. यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मयुरी देठे यांचे लग्न अनिल रावसाहेब देठे, रा. लाख रोड, देवळाली प्रवरा याचे सोबत दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी झाले होते. सुरवातीचे एक वर्षे सासरच्या लोकांनी मयुरी देठे यांना व्यवस्थित नांदविले. त्यानंतर शेत जमीन घेण्यासाठी ५० हजार रुपये माहेरहून आणावेत. या मागणीसाठी सासरच्या लोकांनी मयुरी देठे यांचा शारीरिक व मानसिक छळ केला. मयुरी देठे यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने सासरच्या लोकांनी दि. १९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी मयुरी देठे यांना शिवीगाळ करत लाथा बुक्क्याने मारहाण केली. मयुरी अनिल देठे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीनुसार आरोपी पती- अनिल रावसाहेब देठे, सासरा- रावसाहेब रामचंद्र देठे, सासु- कुंदा रावसाहेब देठे, भाया- सुभाष रावसाहेब देठे, दीर- सुनिल रावसाहेब देठे, सर्व रा. लाख रोड, देवळाली प्रवरा, ता. राहुरी. या पाच जणांवर गून्हा रजि. नं. ५०६/२०२४ भादंवि कलम ४९८ (अ), ३२३, ३४, ५०४, ५०६ प्रमाणे गून्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत

## तुल्यबळ लढतीत अनेकांची प्रतिष्ठा पणाला









**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : लोकसभेच्या तिसऱ्या टप्प्यात पश्चिम महाराष्ट्रातील दहापैकी सात मतदारसंघांत येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे. अर्ज माघारीचा दिवस संपताच चित्र स्पष्ट झाले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेत फूट पडल्यानंतर होणारी ही पहिलीच सार्वत्रिक निवडणूक आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीकडे सातपैकी पाच खासदार आहेत. (भाजप ३ तर शिंदेसेना २) महाविकास आघाडीकडे बारामती आणि सातारा या ठिकाणीच राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) खासदार आहेत. काँग्रेसचा एकही खासदार नाही. भाजप चार, शिंदेसेना दोन तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) एकाच जागेवर लढत आहेत.

काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला पक्षफुटीने तडे गेले असताना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपल्या पाच दशकांच्या राजकीय अनुभवाच्या जोरावर जोडण्या लावल्याने पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघांत प्रतिष्ठेच्या तूल्यबळ लढती रंगणार आहेत. काँग्रेसने कोल्हापुरात शाहू छत्रपती तर सोलापुरात आमदार प्रणिती शिंदे यांना उतरविले आहे. सांगलीची जागा काँग्रेसला न मिळाल्याने काँग्रेसचे विशाल पाटील यांनी आघाडीविरुद्ध बंड केल्याने मुख्य लढत तेच देतील असे वातावरण आहे. सोलापुरात भाजपचे राम सातपुते यांचे आव्हान असले तरी प्रणिती शिंदे गेल्या तीन महिन्यांपासून मतदारसंघ पिंजून काढत आहेत. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि शरद पवार त्यांच्यासाठी जोर लावत आहेत.

माढा मतदारसंघात भाजपमध्ये असणाऱ्या अकलूजच्या मोहिते-पाटील घराण्यातील धैर्यशील मोहिते-पाटील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारीवर रिंगणात उतरले आहेत शिवाय माजी मंत्री, फलटणचे रामराजे निंबाळकर यांनी बंडाचे निशाण हाती घेतल्याने माढ्याची लढत चुरशीची होणार आहे.बारामती आणि साताऱ्यात शरद पवार विरूद्ध अजित पवार अशीच लढत महाराष्ट्राला पाहायला मिळणार होती. मात्र सातारची जागा भाजपने उदयनराजे यांच्यासाठी प्रतिष्ठेची करून घेतली. ते राज्यसभेचे खासदार आहेत. त्यांनी राष्ट्रवादीकडून गत निवडणुकीत विजय मिळविला होता. मात्र, राजीनामा देऊन भाजपकडून लढले. त्यात त्यांचा पराभव झाला. भाजप आणि अजित पवार गटाच्या निर्णयाकडे पाहत आ. शशिकांत शिंदे यांना शरद पवारांनी मैदानात उतरविले आहे.

### विशाल पाटलांचे बंड

सांगली मतदारसंघ हा वसंतदादा पाटील यांच्या नावाने ओळखला जातो. काँग्रेस येथून नेहमीच लढत आली आहे. मात्र महाविकास आघाडीतील काँग्रेस विरोधकांच्या अडथळ्याने उद्धवसेनेला ही जागा सोडण्यात आली. महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील या नवख्या राजकीय कार्यकर्त्यास उमेदवारी दिल्याने भाजपसाठी ही लढत एकतर्फी होती. पण वसंतदादांचे नातू विशाल पाटील यांनी बंड केल्याने महाराष्ट्राचे लक्ष या लढतीकडे लागले आहे.

### राजू शेट्टींमुळे चुरस

हातकणंगले मतदारसंघात राजू शेट्टी यांची निर्णायक ताकद असल्याने महाविकास आघाडीला उमेदवार देताना दमछाक झाली. शेट्टी यांनी शिवसेनेच्या मशाल चिन्हावर लढण्यास नकार दिल्याने माजी आमदार सत्यजित पाटील यांना उद्धवसेनेने रिंगणात उतरविल्याने. ही लढत तिरंगी होणार आहे. राजू शेट्टी यांच्यामुळे आघाडी आणि युतीची दमछाक होईल.